शुक्रवार, २० ऑक्टोबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ७६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 20 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-76 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

# इगतपुरीतील वैतरणा धरणाच्या संपादित जमिनीवर भूमाफियांचा डोळा

## शासनाने विनावापर जमिनी मूळ मालकांना परत कराव्यात

आधुनिक केसरी न्यूज

**विक्रम पासलकर**

**इगतपुरी :** दुष्काळी परिस्थितीत मुंबई करांची तहान भागविण्यासाठी इगतपुरी तालुक्यात सन १९७२-७३ मध्ये वैतरणा आणि आळवंडी नदीवर वैतरणा धरण बांधण्यात आले. त्यासाठी १९६७-६८ सालात सुमारे पस्तीस गावच्या शेकडो हेक्टर जमिनी संपादीत करण्यात आल्या खरया मात्र त्यानंतर धरणाच्या पाण्याखाली कधी गेल्याच नसणाऱ्या आणि प्रत्यक्षात वापरात नसणाऱ्या जमिनींवर आता मुंबई,नाशिक व काही स्थानिक बड्या बड्या भुमाफियांचा डोळा आहे. विशेष म्हणजे भूसंपादन झालेल्या जागेवर सर्रास बेकादेशीर पणे बांधकामे झालेली दिसून येत असल्याने या प्रकरणात जमसंपदा विभाग देखील बघ्याची भूमिका घेवून भू माफियांना आंधळी साथ देत असल्याचा आरोप स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतरीवर्गामधून करण्यात येतोय. दहा वर्षांपूर्वी तत्कालीन आघाडी शासनाच्या काळात माजी आमदार निर्मला गावित यांनी शासकीय पाठपुरावा करून सबंधित जमिनी मूळ मालकांना परत करण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यानंतर विद्यमान आमदार हिरामण खोस्कर यांनी देखील राज्यशासनाकडे हीच मागणी केली खरी तथापि आजी माजी आमदारांच्या या प्रयत्नाला अजूनही म्हणावे तसे यश आले नसल्याने या जमिनी मूळ मालकांना परत मिळाव्यात अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.



इगतपुरी तालुका महाराष्ट्राची चेरापुंजी म्हणून ओळखला जात आहे. या तालुक्यात सर्वाधिक धरणे, लोहमार्ग, स्व बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग, मुंबई आग्रा चौपदरी राष्ट्रीय मार्ग, कावनई किल्ला, उंच सह्याद्री डोंगरांची रांग, जगविख्यात विपशना केंद्र अशा अनेक गोष्टींमुळे राज्य जगभरातून पर्यटक येत असतात. या पर्यटकांचे व स्थानिक तसेच बाहेरील काही भू माफियांची जमिनी हस्तगत करण्यासाठी ची एक टोळी सक्रिय आहे. या मध्ये काही सामाजिक,राजकीय पुढाऱ्यांचा देखील समावेश आहे. त्यांच्यामुळेच अलीकडे मुबई येथील काही राजकीय पुढारी व मंत्री यांचे जवळच्या लोकांच्या धरण परिसरातील गावांमध्ये येण्या जाण्याचा वावर वाढला आहे. खास जमिनी बघण्यासाठी ही मंडळी याठिकाणी येत असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. पर्यटन व इतर गोष्टींमुळे येथील जमिनींचे व्यापारी मूल्य वाढल्याने शहरी धनिकांचे इकडे लक्ष वळाले आहे. या विरोधात स्थानिक राजकीय संघटना न्यायालयाचा दरवाजा ठोठवणार आहे. तर मूळ मालकांना जमिनी परत दिल्या गेल्या नाही तर उग्र आंदोलन करू असा इशारा धरणग्रस्त कृती समितीचे नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सचिव उमेश खातळे यांनी दिला आहे. त्यामुळे भुमाफियांचे धाबे दणाणले आहे.

> गेल्या पाच वर्षांपासून मी विधासभेत सातत्याने या विषयावर आवाज उठवत आलो आहे. शासनाने या मागणीची दखल घेऊन अलीकडे जिल्हाधिकारी नाशिक यांना आदेश पारित केला आहे. लवकरच जमिनी मूळ मालकांना हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. जिल्हाधिकारी यांनी जमिनी मोज माप करण्याच्या सूचना देखील दिल्या आहेत.
> **हिरामण खोसकर, आमदार इगतपुरी**

# १६ कुळी आणि कुणबी मराठा वेगळा

## नारायण राणे : मनोज जरांगे पाटलांनी अभ्यास करावा



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांची काही दिवसांपूर्वी आंतरवाली सराटी येथे सभा पार पडली. या सभेत जरांगे-पाटलांनी मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे. तसेच मराठा समाजाचा ओबीसीत समावेश करावा, अशी मागणी केली होती. ९६ कुळी आणि कुणबी मराठा वेगळा आहे, असे म्हणत केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी गुरुवारी माध्यमांसमोर आपली भूमिका मांडली.**

९६ कुळी आणि कुणबी मराठा वेगळा आहे. कुठलाच मराठा कुणबी प्रमाणपत्र घेणार नाही. मीही आयुष्यभर कुणबी प्रमाणपत्र घेणार नाही, असे नारायण राणेंनी सांगितले. ते मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. नारायण राणे म्हणाले, मराठा आणि कुणबींमध्ये फरक आहे. जरांगे-पाटील मराठा आणि कुणबी एकच असल्याचे सांगतात. पण, तसे काही नाही. जरांगे-पाटलांनी जातीचा आणि घटनेचा अभ्यास करावा. मी मराठा आरक्षणाचा अभ्यास केला आहे. मात्र, जरांगे-पाटील कुणबी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय राहणार नाही, असे बोलत आहेत. मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्राची गरज नाही. मी मराठा असून, आयुष्यभर कधीच कुणबी प्रमाणपत्र घेणार नाही. ९६ कुळी आणि कुणबी मराठा वेगळा आहे, असे नारायण राणेंनी मांडले.

**दहशतवाद हा माणुसकीच्या विरोधातला :** नारायण राणे यांनी यावेळी शरद पवारांवरही टीका केली. ते म्हणाले की, शरद पवार यांनी इस्रायल आणि हमासच्या युद्धावरुन पंतप्रधान नरेंद्र मोदींवर केलेली टीका दुर्दैवी आहे. दहशतवाद हा कुणा एका व्यक्तीच्या विरोधात किंवा देशाविरोधातला नसतो. दहशतवाद हा माणुसकीच्या विरोधातला असतो ही भूमिका पंतप्रधान नरेंद्र मोदींनी संयुक्त राष्ट्रांच्या मंचावरुनही मांडली आहे. या धोरणाप्रमाणे त्यांनी दहशतवादी हल्ल्याविरोधी भूमिका त्यांनी घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदींची भूमिका ही पॅलेस्टाईनच्या विरोधात नाही तर दहशतवादाच्या विरोधात आहे. दहशतवाद विरोधी भूमिका घेणे हे चुकीचे आहे असे शरद पवारांना म्हणायचे आहे का? असा प्रश्न नारायण राणेंनी पत्रकार परिषदेत विचारला. पॅलेस्टिनी आणि दहशतवादी एकच आहेत, असे शरद पवारांना म्हणायचे आहे का? शरद पवार यांनी आपल्या राज्यात आणि देशात आत्तापर्यंत बरीच मंत्रिपदे भूषवली. मुख्यत: ते केंद्रात संरक्षण मंत्रीही झाले होते. तसेच केंद्रातले कृषी मंत्रीपदही त्यांनी सांभाळले आहे. तर महाराष्ट्रात चारवेळा त्यांनी मुख्यमंत्रीपद भूषवले आहे. मला त्यांना आठवण करुन द्यायची आहे, १२ मार्च १९९३ ला मुंबईत साखळी बॉम्बस्फोट झाले. त्यात २५७ जणांचा मृत्यू झाला आणि १४०० लोक जखमी झाले. त्यावेळी शरद पवार राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यांनी त्यावेळी १३ वा बॉम्बस्फोट मशिदीत झाल्याची खोटी माहिती देऊन दहशतवाद्यांना वाचवण्याचा किंवा पाठिशी घालण्याचा प्रयत्न केला नव्हता का? तुष्टीकरणाच्या धोरणामुळे देशावर आजवर अनेक संकटे आली. आता तरी शरद पवार हे तुष्टीकरण सोडून देश प्रथम ही भूमिका घेतील का? असा माझा त्यांना प्रश्न आहे, असा प्रश्न नारायण राणेंनी विचारला आहे.



### महत्त्वाची बातमी

# गव्हासह साखरेच्या मागणीत वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सणासुदीचा हंगाम सुरु असून अनेक वस्तूंच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. त्याचा परिणाम दरांवर दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांपासून साखर आणि गव्हाच्या मागणीतही मोठी वाढ झाली. त्याचा परिणाम भावावर दिसू लागला आहे. सणासुदीच्या मागणीमुळे गहू आणि साखरेच्या दरात लक्षणीय वाढ नोंदवली जात आहे. सणासुदीच्या मागणीमुळे गव्हाच्या किंमती वाढू लागल्या आहेत. गेल्या आठवड्यात दिल्लीत गव्हाच्या भावात पाच ते सहा टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे. दिल्लीत गव्हाने 27 रुपये प्रतिकिलोची पातळी ओलांडली आहे. त्यामुळे गव्हाच्या आयातीला शून्य दराने परवानगी द्यावी किंवा बाजारपेठेत उपलब्धता वाढवण्यासाठी सरकारी एजन्सी एफसीआयची विक्री वाढवावी, अशी मागणी उद्योगाशी संबंधित लोकांकडून सरकारकडे केली जात आहे. दरम्यान, सरकारने पीक वर्ष 2022-23 साठी गहू उत्पादनाचा अंदाज कमी केला आहे. ज्यामुळे गव्हाच्या किंमतीवर आणखी दबाव वाढू शकतो. सरकारने आता 110.55 लाख मेट्रीक टन गव्हाचे उत्पादन होण्याचा अंदाज वर्तवला आहे. यापूर्वी, 2021-22 मध्ये देशातील गव्हाचे उत्पादन 107.74 मेट्रिक टन होते. पीक वर्ष जुलै महिन्यात सुरू होते आणि पुढील वर्षाच्या जुलै महिन्यापर्यंत चालू राहते. दुसरीकडे देशांतर्गत बाजारातही साखरेचे दर वाढत आहेत. भारतातील साखरेचे दर सात वर्षांतील सर्वोच्च आहेत. महाराष्ट्र आणि कर्नाटक या प्रमुख ऊस उत्पादक राज्यांमध्ये यंदा मान्सूनमुळे ऊस पिकावर परिणाम झाला आहे. या कारणास्तव, 2023-24 मध्ये उत्पादन अंदाज 3.3 टक्क्यांनी कमी होऊन 31.7 दशलक्ष टन करण्यात आला आहे.

# खाकीतील डॉक्टर करणार व्यसनमुक्तीवर उपचार

## जिल्ह्यातील १६ तालुक्यांत राबवणार नशामुक्त पहाट अभियान

आधुनिक केसरी न्यूज


राहुल वासनिक

यवतमाळ : नशा करी जीवनाची दशा, अशी म्हण प्रचलित आहे. सद्याचा तरुणवर्ग व्यसनाधीन झाला आहे. तंबाखू, गुटखा व धूम्रपान, मद्यपान अशा व्यसनांचा आपल्या शारीरीक, मानसीक, सामाजिक जीवनावर घातक परिणाम होतात. त्यामुळे तरुणांना व्यसनमुक्त करण्यासाठी खाकीतील डॉक्टर उपचार करणार आहेत. जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ. पवन बन्सोड यांच्या मार्गदर्शनाखाली नशामुक्त पहाट अभियान राबविण्यात येणार आहे.

जिल्हा पोलीस दल, मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील १६ तालुक्यात नशामुक्त पहाट हे अभियान राबविण्यात येणार आहे. राळेगाव, बाभुळगाव, मारेगाव, नेर तालुक्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी "नशामुक्त पहाट" अभियान राबविण्यात आले. सदर कार्यक्रम दोन सत्रात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रथम सत्रात चारही तालुक्यातील शाळा तसेच महाविद्यालयातील एकूण ४५०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. तसेच दुसऱ्या सत्रात तालुक्यातील पालक, पोलिस पाटील, शिक्षक, प्रतीष्ठीत नागरिक अशा १८०० ते २००० नागरिकांनी स्वयंप्रणेने सहभाग नोंदविला. नेर येथील व्यसनमुक्ती कार्यक्रमामध्ये मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र, पुणे येथील विजय देसाई, राळेगाव येथील व्यसनमुक्ती कार्यक्रमध्ये निहार हसबनीस यानी मार्गदर्शन केले. मारेगाव येथील व्यसनमुक्ती कार्यक्रमध्ये अमर देसाई यांनी मार्गदर्शन केले. बाभुळगाव येथील व्यसनमुक्ती कार्यक्रमध्ये IAS अधिकारी स्वप्नील शिसले व नीरज शेवाळे यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रम हा जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. पवन बनसोड, अपर पोलिस अधीक्षक पीयूष जगताप, उपविभागीय पोलिस अधिकारी पांढरकवडा रामेश्वर वेजने यांच्या संकल्पनेतून व मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आज रोजी रामकृष्ण जाधव, ठाणेदार, पोलिस स्टेशन राळेगाव, विजय महाले, ठाणेदार पोलिस स्टेशन, वडकी, बाळासाहेब नाईक ठाणेदार, नेर, ठाणेदार हुड, पो. स्टे. बाभुळगाव, सपोनि. खंडेराव पो. स्टे. मारेगाव, चारही पोलिस स्टेशनचे अधिकारी, अमलदार व होमगार्ड्स यांच्या सहकार्याने पार पडला.

**पथनाट्यातून प्रबोधन :** व्यसन तरुणांमध्ये का वाढत चाललेले आहे, यावर काय उपाययोजना करता येईल. तरुण तणावातून मुक्तता मिळवण्यासाठी, मन शांत ठेवण्यासाठी, एकटेपणा दूर करण्यासाठी. समस्या सोडवण्यासाठी आणि नकारात्मक गोष्टी विसरण्यासाठी व्यसनाची सुरुवात करतात. हळूहळू व्यसनाधीन होत जातात अशा अनेक बाबींचा उहापोह करण्यात आला. व्यसनापासून कसे दूर राहावे, याबाबत शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी, पालक, पोलिस पाटील, शिक्षक, प्रतिष्ठीत नागरिक यांना मार्गदर्शन करण्यात आले. मारेगाव तालुक्यातील कुंबा गावात विद्यार्थ्यांकडून पथनाट्य सादर करण्यात आले. सदर पथनाट्य बघण्यासाठी ५०० ते ६०० लोक हजर होते. सदर कार्यक्रमात व्यसनमुक्ती शपथ देखील घेण्यात आली. सदर शिबिराच्या अनुषंगाने क्रांती चौक येथे जनजागृती पर पथनाट्य देखील सादर करण्यात आले.
**शहरात लावली पोस्टर्स :** यवतमाळ शहरामध्ये सर्व दर्शनीय भागांमध्ये व्यसनमुक्तीबाबद जनजागृती करणारे मोठमोठे पोस्टर्स लावण्यात आलेले आहे. यवतमाळ जिल्ह्यामध्ये सुरु असलेल्या नवरात्री उत्सवामध्ये सहभाग घेणेकरीता येणाऱ्या नागरिकांपर्यंत माहिती जाण्याकरीता मंडळांना दर्शनीय भागांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणारे मोठमोठे पोस्टर्स लावण्या बाबत आवाहन करण्यात आले आहे.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## आँखोंसे जो उतरी हैं दिलमें...

आधुनिक केसरी

माझ्यासाठी वाचन हा दिव्यानंदाची अनुभूती देणारा अनुभव आहे. एखादी छान पौर्णिमेची रात्र असावी आणि खिडकीतून चांदणं आत झिरपत यावं तसा शांत, दिव्य आणि प्रसन्न अनुभव वाचन आपल्याला देतं. या प्रसन्न अनुभवाचं माध्यम असतं एखादं आवडतं पुस्तक, कथा किंवा कविता. डोळ्यांच्या मार्गानं हे चांदणं थेट आतपर्यंत झिरपतं आणि आत्मानंदाचा प्रसन्न अनुभव देतं . एखाद्या पट्टीच्या गायकाला जसा मैफलीत सूर गवसावा आणि मैफल उत्तरोत्तर रंगत जावी तसाच हा अनुभव असतो. या मैफलीत श्रोते जसे सुरांच्या वर्षावाने सचैल न्हाऊन निघतात, तसाच आनंद चांगल्या पुस्तकाचं वाचन आपल्याला देतं. बरं हे वाचन आणि त्याचे प्रकारही वेगवेगळे. मार्ग वेगवेगळे आणि माध्यमही वेगवेगळे. पण परिणाम मात्र एकच असतो आणि तो म्हणजे आनंदाची अनुभूती. जेव्हा मी माझ्यासाठी वाचतो, तेव्हा पुस्तकातील ती अक्षरे अमूर्त रूप धारण करून डोळ्यांच्या खिडकीवाटे थेट मनाच्या गाभाऱ्यात प्रवेश करतात. येताना ती अक्षरे एकेकटी येत नाहीत. ते आपल्यासोबत आनंद, प्रसन्नता कणाकणाने घेऊन आत शिरतात. काळोख्या रात्रीत जसे एखाद्या काचेच्या बरणीत काजवे एकत्र गोळा करावेत आणि ती काचेची बरणी प्रकाशमान व्हावी, तिचा प्रकाश आपल्या चेहऱ्यावर पडावा आणि आपला चेहरा काळोखातही उजळून निघावा तसेच वाचन माझ्या अंतरंग प्रकाशाने भरून टाकते. मनाचा कोपरा न कोपरा उजळून निघतो. उन्हाळ्यात तहानलेल्या धरणीवर जसे पावसाचे थेंब पडावेत आणि थोड्याच वेळात आपल्या शीतलतेने त्यांनी धरित्रीला शांत करावे तसे उत्तम वाङ्मय मनाच्या तहानलेल्या धरणीवर अमृताचे सिंचन करते. मग उन्हाने कोमेजलेले, करपलेले अंकुर टवटवीत होऊन वर येतात आणि ते ' हिरवे हिरवे गार गालिचे ' मनाला प्रसन्नता आणि शांतता देतात. जेव्हा एखादे बुवा, पुराणिक, कथाकार, कीर्तनकार आपल्या रसाळ वाणीद्वारे रामायण, भागवत, हरिविजय, पांडवप्रताप यासारखा एखादा ग्रंथ श्रोत्यांसमोर वाचतात, तेव्हा ते स्वतःबरोबर इतरांनाही आनंदाची अनुभूती देतात.





## आनंदी पहाट

### अंतर्मन नेहमीच अत्यंत महत्त्वाचं

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

व्यक्ती तितक्या प्रकृती, त्यामुळे एकाच कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या आवडीनिवडी, सवयी, मानसिकता ही देखील भिन्न असते. ह्या भिन्न विभिन्न मानसिकतेचा विचार करून कुटुंबामध्ये एकता निर्माण करावी लागत असते. आपल्यासाठी आपलं सुप्तावस्थेत असणारं अंतर्मन अधिक महत्वाचं असतं. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारांचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर होत असतो. विचार, वर्तन आणि व्यवहार सकारात्मक पातळीवर अंतर्मनावर कोरले गेले तर यशप्राप्ती सहज साध्य आणि शक्य होत असते. याउलट नकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार या सर्वांमुळे अंतर्मनाला दुःख आणि एकूणच आपल्या वाट्याला अपयश येतं. आपल्या दृष्टिकोनावर आपले अनुभव संचित होत असतात. हे अनुभव सुख-दुःखाचे म्हणजेच संमिश्र स्वरूपाचे असतात. प्रत्येकाच्या विचारांप्रमाणे आवडी-निवडी, अपेक्षा, गरजा, शारीरिक व्यक्तिमत्व हे निराळं असतं. त्याप्रमाणे त्याला साजेसं, शोभेल असं घरातील वातावरण असणं अथवा ते निर्माण करणं निश्चितच उपयोगाचं ठरतं. अनेकदा दुःख अधिक आणि सुख मात्र अगदी थोडं आपल्या वाट्याला आलं असल्याचं म्हंटलं जातं. खरं तर, जसा चष्मा लावावा तसंच दिसतं. प्रत्येक विषयाकडे आपण कसं पाहतो त्यानुषंगाने आपलं वैचारिक मंथन सुरु होत असतं. सर्वप्रथम बाह्यमन त्याचा विचार करायला लागतं आणि त्याच वेळी आपल्या सुप्त अंतर्मनावर प्रत्येक विषय प्रतिबिंबित होत राहतो. मग क्रिया आणि प्रतिक्रियांचा खेळ सुरु होतो. अंतर्मनावर प्रतिबिंबित झालेले प्रत्येक विचार आपल्या वर्तन आणि व्यवहारांमध्ये परिवर्तन करत राहतात. अनेकदा मनांत येणारे विचार आपल्या गत अनुभवांशी निगडीत असतात तर ते काहीवेळा नजीकच्या भविष्यात काय, कसं आणि कधी घडावं ? याबद्दलचे असतात. आयुष्याच्या अवघड शाळेत आपण कोणत्या वर्गात आहोत, परीक्षा कोणती आहे हे ठाऊक असतंच असं नाही; कॉपी करता येत नाही कारण प्रत्येकाची प्रश्नपत्रिका वेगळी असते.



आधुनिक केसरी

**कर्म रूप सेवा | तारी जन्म ||**

पिटूनी डांगोरा | पापी झाला थोर ||
अंती त्याला घोर | करणीचा ||१||
दुःखाची पालखी | मुक्याने वाहतो ||
अंती सुखावतो | पुण्यवंत ||२||
कर्माने घडते | ज्याचे त्याचे भाग्य ||
फलाशा भोग्य | घात करी ||३||
निष्कामाच्या ठायी | पाणी भाग्य भरे ||
त्याची चिंता हारे | पांडुरंग ||४||
आता तरी थोडा | सावध हो जीवा ||
कर्म रूप सेवा | तारी जन्म ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

तरी दुर्गंधी देहातें ।शुद्धता न ये ॥१५॥
अस्तीपंजर उभविला ।सीरानाडीं गुंडाळिला ।
मेदमांसें सरसाविला ।सांदोसाअंदीं भरूनी
॥१६॥ अशुद्ध शब्दें शुद्ध नाहीं ।तेंहि भरलें
असे देहीं ।नाना व्याधी दुःखें तेंहि ।अभ्यांतरी
वसती ॥१७॥




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अमित ज्ञान मय पुर्ण है, ज्ञान रासि परब्रह्म ।
उतर धार वे जाहि में, सद्गुरु पद अनभ्रम
।।२१।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल तृतीय
अध्याय) ०२/०३/२१

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
अनंत ज्ञानाने परिपूर्ण , ज्ञानाचे भंडार पूर्ण परब्रह्म आहे. त्यांची ज्ञान धारा ज्या आत्म्यात उतरते तोच महापुरूष निर्भ्रांत सद्गुरु पदास प्राप्त होतो.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## शारदीय नवरात्र (माळ चौथी)

आधुनिक केसरी


आज विनायक चतुर्थी पण आहे हा एक अमृत योगायोग आहे. चतुर्थीच्या दिवशी विश्वव्यापक जननी म्हणून मातेची पूजा बांधली जाते. संपूर्ण विश्वाची पालनपोषण करणारी माता, आई ह्या दृष्टीने आपल्या संस्कृतीत पूर्वापार मानलं गेलं आहे. अगदी रामायणाच्या आधी सुध्दा नवरात्रोत्सव होत होता हे अभ्यासा वरून सिध्द झाले आहे. नवरात्राची देवीची पूजा श्रीरामांनी सुध्दा केली हे आवर्जून या ठिकाणी नमुद करावसं वाटतं जीवन हे गतिशील आहे, त्यांचे ध्येय पुढे जात राहते हे असून ते देवीच्या कृपेवर अवलंबून आहे. गीतेत पत्र, पुष्प, फल, तोय जो भक्तिभावाने अर्पण करतो त्याला देव पावतो असे सांगितले आहे म्हणून प्रत्येक जीवाने देवपूजा ही केलीच पाहिजे.बाह्यपूजेने मन एका उच्च पातळीवर आले म्हणजे मग नुसती मानसपूजा केली तरी चालेल. आज आपण 21व्या शतकात वावरत आहोत,आपले अनेक देशवासी परदेशात असतील त्यांना मनापासून पूजा विधी करावयाचा आहे. नवरात्र तर बसवायचं आहे.पण देवपूजेचे साहित्य उपलब्ध नाही,ते आणुन द्यायला माहीतगार कोणी नाही,किंवा देवपूजेचे सामान कुठे मिळते हे माहीत नाही. तर अशा लोकांनी मानसपूजा केली तरी चालते.किवा मानसपूजा कशी करावी हे एक अभ्यासक म्हणून समजून घेणार आहोत. मानसपूजा करताना साधकांचा भक्तिभाव व सोहं भाव विसरून पराकोटीला पोहचलेला असला पाहिजे. आत्मप्रचीति स्वस्वरूपात दिसले पाहिजे इतकेच नाही तर ते समक्ष दिसतचं आहे अशी मनाची एकाग्रता करून पूजेला सुरुवात केली पाहिजे. जितके दिवस मूर्ती आत्मभावस्य होतं नाही अंतःकरणात प्रतीत होत नाही तोपर्यंत अज्ञान रूपी अंधकार नष्ट झाला आहे असे समजू नये. देवीची इष्ट मूर्ती आत्मभावस्य झाली की इतर कोणती ही मूर्ती अंतःकरणात लीलया साकार होते. भक्ति भावाची हीचं पराकाष्ठा समजावी. जळी, स्थळी काष्ठी पाषाणी सर्वत्र परमात्म शक्तिंचे रूप दिसू लागते.अष्टभाव दाटून येतात आणि मन हळूहळू" "मी "पणात लोपले जाते. आई जगदंबा कृपा पूर्वक साधकाच्या अंतःकरणात आत्मस्वरूपाचे दर्शन देते!!! ते स्वरूप प्रत्यक्ष दिसत असताना नेत्रावाटे घळाघळा आनंदाश्रू ओघळत असतात. आत्मा त्या स्वरूपात ब्रम्हानंदाचा आनंद उपभोगत असतो. जीवन सफल झाल्याचे त्यांच्या मुखकमलावर दिसत असते. त्याचे तेज झळकत असते. ह्यालाच ब्रम्हानंद असे म्हणतात. मनुष्य जन्म मिळाला आहे. तर त्या जन्माचे सार्थक केले पाहिजे. ज्याला मानसपूजा मध्ये आनंद लुटता येतो त्याला बाह्योपचाराची मुळींच गरज नसते. म्हणूनचं साधकाने दृढ निश्चयाने साधना केली पाहिजे. बरीचशी साधना पूर्वीचे दोष घालवण्यात खर्च होते. कारण देव काही तुम्हाला सहजासहजी भेटणारा नाही.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## प्रपंचात परस्परांशी प्रेमभाव कसा वाढेल ?

आधुनिक केसरी



निसर्गतःच प्रेम हे प्रत्येक व्यक्तीत आणि प्राणिमात्रांत असते. फार काय, प्रेमाशिवाय मनुष्यप्राणी जिवंत राहू शकणार नाही. प्रेमाने सर्व जग वश करून घेता येते. प्रेम ठेवण्यात पैसा खर्च होत नाही, कष्ट होत नाहीत. परंतु प्रत्येकाचा अनुभव पाहावा तर प्रेम करणे तितकेसे सोपे आहे असे दिसत नाही. याचे कारण प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव निराळा, आवड निराळी, आणि दैवयोगाने आलेले ऋणानुबंध निरनिराळे असतात. आपल्या विचाराचे लोक असतील त्यांच्यावर स्वाभाविकच प्रेमच जडते; विरूद्ध असतील त्यांच्याबद्दल प्रेम वाटत नाही, किंबहुना द्वेषही उत्पन्न होतो. द्वेष उत्पन्न का होतो तर आपला आणि दुसऱ्याचा विचार आणि आवड जमत नाही म्हणून. परंतु थोडा विचार केला तर असे दिसते की, आपण ज्या कारणामुळे दुसऱ्याचा द्वेष करतो, तेच कारण दुसऱ्याने आपला द्वेष करायला पुरेसे होते. उदाहरणार्थ, एखादी गोष्ट आपल्याला न आवडली आणि तीच दुसऱ्याला आवडली, तर मला न आवडलेली गोष्ट दुसऱ्याला आवडल्यामुळे दुसऱ्याचा द्वेष करायला मला तेवढे कारण पुरेसे होते. मग त्याच न्यायाने, त्याला न आवडलेली गोष्ट मला आवडते हेच कारण त्याने माझा द्वेष करायला पुरेसे नाही का ? 'व्यक्ती तितक्या प्रकृती' अशी म्हण आहे. त्याचा अर्थच असा की, स्वभावाप्रमाणे प्रत्येकाची आवड ही निराळी असणारच. म्हणून द्वेषबुद्धी नाहीशी करण्याकरिता प्रत्येकाच्या स्वभावाला थोडी सवलत ठेवणे जरूर आहे; आणि प्रेम जडण्याकरिता, सर्वांना आवडणारी जी गोष्ट असेल तिकडे लक्ष देणे जरूर आहे. प्रेम करण्याचा धडा गिरवताना सुरूवात आपल्या घरापासून करावी; घरातली माणसे, नंतर शेजारी, आणि त्यानंतर आजूबाजूला, आपलेपणाची भावना आपल्या कृतीने वाढवावी; म्हणजे क्रमाक्रमाने प्रेमाची वाढ होऊन सर्व वातावरण प्रेममय होऊन जाईल. सर्वांशी निष्कपट प्रेमाने वागावे; आपल्या बोलण्यामध्ये, नव्हे, पाहण्यामध्येसुद्धा प्रेम असावे. आपले बोलणे अगदी गोड असावे. आपल्या अंगी सहजता यावी. घरामध्ये 'अमुक एक गोष्ट कराच' किंवा 'नकाच करू' असे हट्टाने न म्हणता आपण राहावे. जसे घडेल तसे घडू द्यावे. देह असा प्रारब्धावर टाकणे मला फार आवडते. प्रेम करायला गरिबी आड येत नाही, किंवा श्रीमंती असेल तर फार द्यावे लागत नाही. जसे आई आणि मुलाचे प्रेम असते तसे भगवंताचे प्रेम लागावे. ज्याला भगवंताचे प्रेम येईल, तो सृष्टीकडे कौतुकाने पाहील. भगवंताचे प्रेम हे कोणत्याही साधनाचा प्राण आहे; ते मागण्यासाठी रोज भगवंताची प्रार्थना करावी, आणि त्याच्या अनुसंधानात राहण्याचा प्रयत्न ठेवावा.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, २० ऑक्टोबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari



निसर्गातील सोनं! सध्या सह्याद्रीच्या डोंगरमाथ्यावर स्वर्गीय असा नजारा मानवी डोळ्यांना सुखावत असून सातारा पाटण खोऱ्यातील हा सोन्याचा डोंगर पर्यटकांना आकर्षित करत आहे. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# चंद्रपूरच्या विकासाला प्राधान्य देणार

## विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते महाआरती

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** हा राज्यातील शेवटच्या टोकावर असलेला जिल्हा असला तरी या जिल्हाची मोठी धार्मिक, सामाजिक व ऐतिहासिक ओळख आहे. हा वीज उत्पादक जिल्हा आहे. या जिल्ह्याशिवाय राज्यात लखलखाट होऊ शकत नाही. हा जिल्हा राज्याची ज्योत आहे. या जिल्ह्याने राज्याला प्रकाश दिला. त्यामुळे येथील प्रश्नांची दखल नक्कीच घेण्यात येणार असून चंद्रपूरच्या विकासासाठी येणा-या प्रश्नांना प्राधान्य देणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केले.

श्री महाकाली माता महोत्सव समितीच्या वतीने चंद्रपूरात आयोजित श्री माता महाकाली महोत्सवाचे उद्‌घाटन राज्याचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी श्री माता महाकाली सेवा समितीचे अध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार, राजूरा विधानसभा क्षेत्राचे आमदार सुभाष धोटे, वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्राच्या आमदार प्रतिभा धानोरकर, सर्वोदय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा सुधा पोटदुखे, मनिष महाराज, कल्यानी किशोर जोरगेवार, महाकाली माता महोत्सव समितीचे उपाध्यक्ष विजय मोगरे, सुनिल महाकाले, कोषाध्यक्ष पवण सराफ, सचिव अजय जयस्वाल, सदस्य बलराम डोडाणी, काँग्रेसचे जिल्हा शहर अध्यक्ष रामू तिवारी, माजी नगरसेवक नंदु नागरकर, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष मधूसूदन रुंगठा, योग नृत्य परिवाराचे गोपाल मुंधडा, सराफा असोसिएशन अध्यक्ष राजेंद्र लोढा, डॉ. दाबेरे, मिलींद गंपावार, श्याम धोपटे, यंग चांदा ब्रिगेड च्या महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, जिल्हा महानगर अध्यक्ष पंकज



गुप्ता, बंगाली समाज महिला शहर संघटिका सविता दंडारे, सायली येरणे, युवा नेते अमोल शेंडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते माता महाकाली मंदिर समोरील 151 फुट उंचिच्या माता महाकाली महोत्सवाच्या ध्वजाचे लोकार्पण करण्यात आले. त्यांनतर आयोजित चित्रकला स्पर्धेचेही त्यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. या चित्रकला स्पर्धेत एक हजार हून अधिक शालेय विद्यार्थांनी सहभाग घेतला आहे. या प्रसंगी राहुल नार्वेकर यांच्या हस्ते माता महाकालीची महाआरती करण्यात आली. या कार्यक्रमात बोलताना राहुल नार्वेकर म्हणाले की, विमानतळा पासून ते महाकाली मंदिर पर्यंत सुंदर सजावट करण्यात आली आहे. मातेच्या भक्तांमध्ये उत्साह दिसत आहे. हा महोत्सव जणू चंद्रपूरकरांची दिवळीच असल्याचा प्रत्यय यातून येत आहे. सुरु केलेली ही प्रथा याच उत्साहात कायम ठेवा. मातेची कृपा सदैव आपल्यावर राहिल. चंद्रपूरचे माता महाकाली मंदिर हे देशातील सर्वाधिक प्राचीन मंदिरांपैकी एक आहे. या पूरातन वास्तूचे जतन आपण केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कालखंडा पुर्वी पासूनचा इतिहास या वास्तूने अनुभवला आहे. आज भारत चंद्रावर पोहोचला आहे. जगातील 4 मोठी अर्थव्यवस्था म्हणून भारत समोर आला आहे. हे आपण आपल्या संस्कृतिचे जतन आणि पालन केल्यामुळेच शक्य झाले असल्याचे ते यावेळी म्हणाले.

चंद्रपूर येथील पवित्र दिक्षाभुमीचा विकास क्रमप्राप्त आहे. अधिवेशनाच्या पूर्वी आपण पाठपूरावा करुन येथे अपेक्षित असा विकास व्हावा यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही ते यावेळी म्हणाले. राहुल नार्वेकर यांनी आमदार किशोर जोरगेवार यांच्या राजमाता निवासस्थानी भेट देत आमदार जोरगेवार यांच्या मातोश्री गंगुबाई उर्फ अम्मा यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी अम्मा का टिफिनची माहिती जाणून घेतली.

# मंदा म्हात्रेंच्या संरक्षणात अचानक केली वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**नवी मुंबई :** भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दौऱ्याच्या निमित्ताने मंगळवारी अचानक आ. मंदा म्हात्रे यांच्या सुरक्षेत वाढ करण्याचा निर्णय नवी मुंबई पोलिसांनी घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचवल्या आहेत. आ. म्हात्रे यांना सध्या एका शस्त्रधारी पोलिसाचे संरक्षण आहे. मंगळवारी दुपारपासून त्यांच्या सुरक्षेसाठी एक पोलीस निरीक्षक दर्जाचा अधिकारी आणि अन्य तीन पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

ठाणे लोकसभा मतदारसंघातील प्रमुख नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यासाठी मंगळवारी दिवसभर चंद्रशेखर बावनकुळे ठाणे आणि नवी मुंबईच्या दौऱ्यावर होते. ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे कार्यकर्त्यांशी संवाद साधल्यानंतर शहरातील मुख्य बाजारपेठेत त्यांनी व्यापारी, ग्राहकांच्या भेटीगाठी घेतल्या आणि दुपारनंतर ते नवी मुंबईच्या दिशेने निघाले. ऐरोली येथे त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आल्यानंतर वाशी येथे त्यांच्या वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ऐरोली मतदारसंघाचे आ. गणेश नाईक यांचे पुत्र संदीप यांच्याकडे भाजपचे जिल्हाध्यक्षपद सोपविण्यात आल्यानंतर बावनकुळे यांचा नवी मुंबईत पहिलाच दौरा आयोजित करण्यात आला होता. त्यामुळे नाईक कुटुंबीयांकडून जोरदार शक्तिप्रदर्शनाची आखणी करण्यात आली होती. ठाणे-बेलापूर मार्गावर जागोजागी बावनकुळे यांच्या स्वागताचे फलक लावण्यात आले होते. त्यावर संदीप नाईक आणि माजी खासदार संजीव यांची छायाचित्रे प्रकर्षाने लावण्यात आली होती. दरम्यान, बावनकुळे यांच्या दौऱ्यातील पहिल्या टप्प्यात आ. मंदा म्हात्रे कुठे दिसल्याच नाहीत. ऐरोली विधानसभा क्षेत्रात त्यांनी जाणीवपूर्वक येणे टाळल्याची चर्चाही यानिमित्ताने रंगली होती. मात्र बावनकुळे यांचा बेलापूर मतदारसंघात वाशी येथून प्रवेश होताच आ. म्हात्रे त्यांच्या समर्थकांसह या दौऱ्यात सहभागी झाल्या. बावनकुळे यांच्या स्वागतासाठी संपूर्ण शहरभर नाईक कुटुंबीयांकडून बॅनर उभारणी करून वातावरण निर्मिती करण्यात आली होती. बेलापूर मतदारसंघात काही तुरळक अपवाद वगळले तर आ. म्हात्रे यांचे फलक मात्र फारसे दिसत नव्हते.

# डॉ. अभय पाटील यांची लोकप्रियता स्वपक्षीयांनाच बोचली

## पक्षांतर्गत गटबाजी झाली सक्रिय : पक्षश्रेष्ठींनी दखल घेण्याची गरज

आधुनिक केसरी न्यूज

**वाशीम :** एकेकाळी अकोला लोकसभा मतदार संघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जात होता. माजी केंद्रीय मंत्री वसंत साठे, मधुसूदन वैराळे या दिग्गजांनी येथून विजयश्री प्राप्त करत काँग्रेसचा हा अभेद्य गड शाबूत राखला होता. परंतु 1989 नंतर येथे भाजपने आपले वर्चस्व प्रस्थापित करत काँग्रेसचा हा गड अगदी सहजगत्या आपल्या ताब्यात घेतला. तेंव्हा पासून आजतागायत भाजपचे वर्चस्व आणि प्रभाव अकोला लोकसभा मतदार संघावर अबाधित आहे. मध्यंतरी १९९८ व १९९९ या दोन निवडणुकीत काँग्रेसने भारिप_ बहुजनशी आघाडी करत आपला उमेदवार उभा न केल्याने भारिप_बहुजनला येथे यश मिळवता आले होते.हा अपवाद वगळल्यास २००४ पासून अकोला लोकसभा मतदारसंघ निर्विवाद भाजपच्या ताब्यात आहे. मात्र बदलत्या परिस्थितीनुससार २०१४ चा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिष्मा ओसरला असून सद्यस्थितीत राज्यात व देशात भाजप विरोधी लाट निर्माण झाली असल्याचे सर्व सामान्य जनतेच्या चर्चेवरून स्पष्ट होत आहे.परिणामी देशातील लोकांचा कल काँग्रेससह, महविकास आघाडीकडे वळला असल्याचे स्पष्ट चित्र समोर येत आहे. या संधीचा फायदा करून घेण्यासाठी काँग्रेसकडे उच्चविद्याविभूषित, सर्व सामान्यांशी नाळ जोडलेले, वैद्यकीय क्षेत्रा बरोबरच इतर क्षेत्रात निष्णात असलेले डॉ. अभय पाटील यांचा सारखा प्रभावी व दमदार चेहरा आहे.डॉ. पाटील यांना काँग्रेसने उमेदवारी दिली आणि महविकास आघाडीतील घटक पक्षांनी ती स्वीकारली तर, निश्चितच अकोला लोकसभा मतदारसंघात भाजप प्रणित आघाडीचा दारुण पराभव होईल असा अंदाज केवळ राजकीय तज्ञच नव्हे; तर सर्व सामान्य मतदार सुध्दा वर्तवित आहेत.परंतु कालपरवा अकोला येथील एका पत्रकार परिषदेत घडलेली निंदनीय किरकोळ घटना आणि त्यात डॉ. अभय पाटील यांचे जाणीवपूर्वक स्वपक्षीयांकडून करण्यात आलेले खच्चीकरण काँग्रेस सारख्या एका राष्ट्रीय पक्षासाठी अशोभनीय बाब आहे.त्याचा पक्षाला पुढील काळात मिळणाऱ्या यशावर विपरीत परिणाम होऊ शकतो.याच आत्मपरीक्षण कुठ तरी व्हायला पाहिजे. अशी चर्चा अकोट, अकोल्या पासून थेट रिसोड पर्यंत चर्चिल्या जात आहे.या गंभीर बाबीकडे राज्यातील काँग्रेसचे खंबीर व दमदार नेतृत्व असलेले प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले आणि जेष्ठ पक्षश्रेष्ठीनीं त्वरित दखल घेऊन सदर घटनेची इतरत्र कोठेही पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घ्यावी अशी अपेक्षा मतदार संघातील काँग्रेस समर्थक व्यक्त करीत आहेत. डॉ. अभय पाटील हे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे विद्यमान सरचिटणीस आहेत.आगामी लोकसभा निवडणुक लक्षात घेऊन त्याअनुषंगाने त्यांनी नुकताच संपूर्ण मतदारसंघात जनसंपर्क दौरा काढला होता. सदर दौऱ्यात त्यांनी कोणावरही व्यक्तिक टिका न करता राज्यातील व केंद्रातील विद्यमान सरकार सर्वसामान्यांची व विशेषतः शेतकऱ्यांची कशी गळचेपी करत आहे हे जनतेला पटवून देत होते. त्याच बरोबर काँग्रेस पक्ष समाज, समता आणि बंधुत्वच्या भावनेतून सर्व घटकांना सोबत घेऊन चालणारा पक्ष आहे. तद्वतच देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी काँग्रेसचे योगदान व पुढील काळात काँग्रेसने आखलेली ध्येयधोरणे डॉ. पाटील यांनी समाजातील अखेरच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे कार्य जनसंपर्क दौऱ्यातून केले आहे. संपूर्ण दौऱ्यात त्यांनी लोकसभा मतदार संघातील प्रत्येक शहर, गाव न गाव पिंजून काढले प्रत्येक ठिकाणी त्यांचे उत्सफुर्त स्वागत करण्यात आल्याचे सर्वश्रुत आहेच,यात बऱ्याच ठिकाणी त्यांनी समर्थकांना संबोधित सुध्दा केले. पण, यात त्यांनी " मीच पक्षाचा उमेदवार आहे, किंव्हा मलाच मते द्या..! अशी कुठेच वाच्यता सुध्दा केली नाही. उलट त्यांनी प्रत्येक ठिकाणी मार्गदर्शनामधे फक्त आणि फक्त हेच म्हटले आहे की, " मी, मत मागायला नाही,तर काँग्रेस पक्षाचे " मत " तुमच्या पुढे मांडायला आलेला आहे. कारण इतिहास साक्ष आहे की, काँग्रेसने आजपर्यंत देशाच्या समृध्दीसाठीच राजकारण केले आहे. आजच्या विफल राजकीय परिस्थितीत देशाला" काँग्रस" हाच पर्याय आहे, असे डॉ. अभय पाटील यांनी आपल्या दौऱ्यातून सर्व सामान्यांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला आहे. याचा विपर्यास करत काँग्रेसमधील काही इच्छुक उमेदवारांनी त्यांना "पॅराशूट उमेदवार" म्हणत डॉ. पाटील यांना हिनवण्याचा जो प्रयत्न केला त्यात काँग्रेस पक्षाची लक्तरे वेशीवर टांगल्या जातील याची थोडीफार तरी संबंधितांनी काळजी घ्यायला पाहिजे होती. अशी खमंग चर्चा अकोला आणि वाशिम जिल्ह्यात ऐकावयास मिळत आहे. परिणामी अकोला लोकसभा मतदारसंघाच्या पूर्वीच्या झालेल्या निवडणुकांचा अभ्यास केल्यास विरोधकांपेक्षा काँग्रेसच्याच "अदृष्य" हातांनी अकोल्यामधे काँग्रेसचे पानिपत केले असल्याचे जुनेजाणते राजकीय तज्ज्ञ बोलत आहेत त्याचबरोबर डॉ. अभय पाटील यांच्यासारखा सृजशील व सर्वांना सोबत घेऊन चालणारा प्रभावी व दमदार उमेदवार दिल्यास निश्चितच अकोला लोकसभा मतदारसंघात परिवर्तन घडू शकते, अशी ग्वाही सर्व सामान्य जनता देत आहे.



वसंत खडसे
9373578429



# नितेश राणेंचा आरोप

आधुनिक केसरी

महाराष्ट्रात सध्या मोठे ड्रग्ज रॅकेट समोर आले आहे. ड्रग्जमाफिया ललित पाटील याला अटक झाली आहे. यावरून भाजप नेत्याने थेट 'मातोश्री'वर आरोप केलेत. चोर की दाढी में तिनका म्हणतात तसे आहे... सुशांत सिंहची आत्महत्या होती तर कोर्टात जाण्याची काय गरज होती? लवकरच योग्य माणसाला शिक्षा मिळणार आहे. ललित पाटील महायुतीचा माणूस होता असे म्हणायचे. आता तो मोहरा कसा झाला? जेव्हा ललित पाटील जेव्हा तोंड उघडेल तेव्हा ठाकरे गटाचे नेते जेलमध्ये असतील. ठाकरे गट उद्या नाशिकमध्ये मोर्चा काढणार आहे. नाशिकमध्ये मोर्चा काढण्यापेक्षा एक मोर्चा मातोश्रीवर मोर्चा काढावा. कारण ड्रॅग माफियांच्या सर्वात मोठा मित्र मातोश्रीवर आहे, असा गंभीर आरोप भाजप आमदार नितेश राणे यांनी केला आहे. सुशांतसिंह मर्डर प्रकरणात आदित्य ठाकरेचा राजीनामा का घेतला नाही? आमच्या मंत्र्यांचा राजीनामा मागण्याचा अधिकार ठाकरे गटाच्या नेत्यांना नाही. आर्थर रोड जेलची खोली साफ करण्याचे काम सुरु आहे. लवकरच संजय राऊतसाहेब तिकडे जातील. फडणवीस साहेबांचे डोके ठिकाणावर आहे, असे राऊत म्हणत आहेत. म्हणूनच तुझ्या मालकाची झोप उडाली आहे. मातोश्रीवरचा वाईनचा साठा संपला आहे, असे नितेश राणे म्हणाले आहेत. तुझ्यात हिंमत असेल तर तू पत्राचाळमध्ये जाऊन दाखव. लोकांनी तुला चपलेने मारले नाहीतर माझा नाव बदलेन. 140 कोटी जनतेतून एकाने चुकून राहुल गांधीचे नाव घेतले असेल तर त्याला त्याची चूक 2024 मध्ये समजेल. जो लाईटचे बटन ऑन करेल तो काँग्रेसचा नेता, कार्यकर्ता नाही. तुमचा नेताच म्हणाला आहे. कार्यकारिणीमध्ये निष्ठवाण नाहीत. भांडी डबे उचलणारे बूट उचलणारे ठाकरेंच्या कार्यकारिणीमध्ये आहेत. शरद पवार यांनी म्हाडाची लोकसभा निवडणूक लढवावी, असे नितेश राणे यांनी म्हटले आहे. देशाचे पंतप्रधान मोदींजींनी काल इजराईलच्या भूमिकेचे समर्थन केले. त्यावर शरद पवारांनी टीका केली आहे. 93 च्या दंगलीच्या काळात दहशदवादी काय करु शकतात हे माहीत असताना फक्त मतांसाठी राजकारण करतात. हमासचा निषेध करताना आम्ही उद्धव ठाकरे, शरद पवारांना ऐकलं नाही. ते अप्रत्यक्ष पद्धतीने पाठिंबा देत आहेत. उद्या ओवेसींच्या रॅलीत हे सहभागी होतील. मतांच्या राजकारणासाठी संजय राऊत मोदींवर टीका करत आहे. त्याची लायकी नाही, असा घणाघातही नितेश राणे यांनी केला आहे.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# मुलांमध्ये वाढत चाललेली हिंसक मानसिकता

आधुनिक केसरी

**अलिकडच्या काही वर्षांत भारतासह जगभरात गुन्हेगारी प्रकरणांमध्ये अल्पवयीन मुलांचा सहभाग आश्चर्यकारकरित्या वाढला आहे. अलीकडच्या काळात भारतात अशा अनेक घटना उघडकीस आल्या आहेत, ज्यामध्ये लहान मुले आणि किशोरवयीन मुले लहानसहान गोष्टींवरून हिंसक होतात आणि खून आणि बलात्कारासारख्या अत्यंत क्रूर घटनाही घडवतात.उदाहरणार्थ, उत्तर प्रदेशातील कानपूर ग्रामीणमध्ये पाच वर्षांच्या मुलीशी सात वर्षांच्या मुलाने दुष्कर्म केले. अशाच प्रकारे सुमारे दोन महिन्यांपूर्वी कानपूरमध्येच मित्राशी बोलण्यासाठी एका तेरा वर्षीय विद्यार्थ्याने आपल्या पंधरा वर्षांच्या वर्गमित्राचा गळ्यावर चाकूने सहा वार करून व्यावसायिक किलरप्रमाणे खून केला होता.**

या घटनेचा तपास करण्यासाठी शाळेत पोहोचलेले पोलीस आणि फॉरेन्सिक टीम किशोरच्या क्रौर्याने आणि बेधडकपणाने हैराण झाली. सुमारे तीन महिन्यांपूर्वी उत्तर प्रदेशातील रायबरेली लालगंज पोलीस स्टेशन परिसरात एका पंधरा वर्षीय अल्पवयीन मुलाने 5 लाख रु. खंडणीसाठी उन्हाळ्याच्या सुट्टीत मामाच्या घरी आलेल्या नऊ वर्षांच्या मुलाचे अपहरण करून हत्या केली होती. दुर्दैवाने, आजकाल देशाच्या विविध भागांत अशा घटना वारंवार घडताना दिसतात. आजकाल लहान मुलं हृदय पिळवटून टाकणाऱ्या घटना अगदी सहज आणि कसलाही संकोच न बाळगता करू लागली आहेत. ही अत्यंत चिंताजनक बाब म्हटली पाहिजे. लहान मुले आणि किशोरवयीन मुले अत्यंत गंभीर गुन्ह्यांमध्ये सामील असल्याच्या घटनांच्या बातम्या देशभरातून वारंवार येत आहेत.

नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) च्या आकडेवारीनुसार, 2020 मध्ये नोंदवलेल्या 29,768 केसेसच्या तुलनेत 2021 मध्ये देशभरात एकूण 31,170 बालगुन्हेगारांवर गुन्हे नोंदवले गेले.म्हणजे अवघ्या एका वर्षात बालगुन्हेगारीचे प्रमाण ६.७ टक्क्यांवरून ७.० टक्क्यांवर पोहोचले. याचा अर्थ असा की 2021 मध्ये देशातील शंभरपैकी सात किशोरवयीन मुले कोणत्या ना कोणत्या गुन्हेगारी कृतीत गुंतलेली होती. जर आपण आकडेवारीवर नजर टाकली तर, गुन्हेगारी आणि कायद्याच्या उल्लंघनात गुंतलेल्या सर्व केंद्रशासित प्रदेशांमधील एकूण 3129 अल्पवयीन मुलांपैकी 2643 एकट्या राजधानी दिल्लीतील आहेत, तर राजस्थानसारख्या मोठ्या राज्यात 2757 प्रकरणे नोंदवण्यात आली होती आणि तामिळनाडू मध्ये नोंदणीकृत 2212 प्रकरणे होती. एनसीआरबीच्या मते, वीस लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या एकोणीस महानगरांमध्ये अशा गुन्ह्यांच्या संख्येत सातत्याने घट होत आहे, जी 2019 मध्ये 6885, 2020 मध्ये 5974 आणि 2021 मध्ये 5828 होती, तर दिल्ली या यादीत अव्वल स्थानावर आहे. सर्वाधिक प्रकरणे 2021 मध्ये 2618, 2019 मध्ये 2760 आणि 2020 मध्ये 2436 प्रकरणे नोंदवली गेली.

विशेष म्हणजे ही सर्व आकडेवारी पोलिसांच्या कागदपत्रांमध्ये नोंदवलेल्या घटनांचीच आहे. या व्यतिरिक्त देशभरात अशा किती तरी घटना घडत असतील, ज्या कधीच समोर येत नसतील. कल्पना करा की ज्या वयात मुलं मिठाई, खेळणी यावर हट्ट करतात आणि खेळायला जातात, त्या वयात ते खून, बलात्कार, अपहरण यांसारख्या पाशवी कृत्ये करू लागले आहेत. ही समाजासाठी किती चिंताजनक परिस्थिती आहे, असे म्हणावे लागेल. निश्चितच, मुलांना वाढवणारे पालक आणि शिक्षकच नव्हे, तर आपले कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि शालेय वातावरणही याला मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे मुलांना हिंसक बनवण्यात मोबाईल आणि टीव्हीचाही मोठा वाटा आहे. हिंसक बनणारी बहुतांश मुले मोबाइल किंवा टीव्हीवरील हिंसक दृश्यांमुळे प्रेरित होतात. आपल्या वर्गमित्राची निर्घृण हत्या करणाऱ्या एका तेरा वर्षांच्या तरुणाने कोणताही आढेवेढे न घेता आणि चेहऱ्यावर सुरकुत्या न ठेवता ऑनलाइन, गुगल आणि यूट्यूबवर सर्च करून हत्येची पद्धत शिकल्याचे पोलिसांना सांगितले होते.

आज सर्वत्र हिंसेचा घटक प्रभावी ठरला आहे, ज्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मुलांच्या मानसिकतेवर परिणाम होत आहे. सिनेमा असो की टीव्ही, मोबाईल असो वा व्हिडीओ गेम्स, सर्वत्र हिंसाचाराचा बोलबाला होतो आहे. इंटरनेटचे विस्तीर्ण जग देखील हिंसक दृश्ये आणि कार्यक्रमांनी भरलेले आहे. आजकाल बातम्या आणि जाहिरातीही हिंसाचाराच्या दृश्यांनी भरलेल्या असतात. एक काळ असा होता की घरातील मोठ्या मुलांना देश आणि जगात घडणाऱ्या घडामोडींची माहिती व्हावी, यासाठी बातम्या पहायला आणि ऐकायला सांगितलं जात असे. विविध स्पर्धांची तयारी करणाऱ्या मुलांनी सामान्य ज्ञान वाढवण्यासाठी बातम्या पाहणे आणि ऐकणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे याआधी टीव्हीवरील जाहिराती खूप मनोरंजक होत्या. काही वेळा हे कार्यक्रमांपेक्षा चांगले वाटायचे, पण आता तेही हिंसाचाराने भरले जाऊ लागले आहेत. डास, झुरळे इत्यादींना मारणाऱ्या उत्पादनांच्या जाहिराती इतक्या हिंसक असतात की मुले त्यांच्या स्वप्नातही या कीटकांशी सामान्यपणे वागू शकत नाहीत, मग दयाळूपणा तर सोडूनच द्या. अशा परिस्थितीत, हिंसक दृश्ये आणि वर्तनापासून मुलांचे संरक्षण कसे होऊ शकते?

मानसोपचार तज्ज्ञांचा असाही विश्वास आहे की मेंदूच्या अनुकूलतेमुळे मुले चित्रपट, व्हिडिओ गेम आणि टीव्ही कार्यक्रमातील पात्रांवर सहज प्रभावित होतात आणि त्यांना आपला नायक मानतात आणि स्वतः त्या नायकांसारखे वागू लागतात. अर्थात, मुले वास्तविक आणि बनावट जगामध्ये फरक करू शकत नाहीत आणि वास्तविक जीवनात ते त्यांच्या नायकांच्या हिंसक वर्तनाची पुनरावृत्ती करतात. खेळण्यासारखी बंदूक हातात घेऊन त्यांचे नायक ज्या सहजतेने कोणालाही मारतात त्यामुळे मुलांना असे वाटते की एखाद्याला बंदुकीने मारणे हे त्यांच्या खेळासारखे सामान्य वर्तन आहे. हळूहळू ही वागणूक त्यांचा स्वभाव बनतो, जो ते सोडू शकत नाहीत. अशा परिस्थितीत, जेव्हा कोणी त्यांना व्हिडिओ गेम खेळण्यापासून किंवा टीव्ही पाहण्यापासून थांबवते तेव्हा ते त्यांच्या भावनांवर नियंत्रण गमावतात आणि हिंसक बनतात. मोबाईल गेम खेळण्यापासून रोखले म्हणून आईला आणि बापाला ठार मारल्याच्या घटना आपल्या महाराष्ट्रातही घडल्या आहेत. वास्तविक अधिक गुन्हेगारी दृश्ये पाहिल्यामुळे मुलांमध्ये संयम बाळगण्याची क्षमता झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे ते अत्यंत चिडचिडे आणि संतप्त होऊ लागले आहेत.

त्यामुळे केवळ हिंसक दृश्ये पाहून मुलांमध्ये हिंसेची भावना निर्माण होत नाही, तर त्यांचा मेंदू सभोवतालच्या वातावरणातील बदल आणि मानवी वर्तन स्वीकारण्यास असमर्थ ठरतो, तेव्हादेखील त्यांच्यात हिंसक प्रवृत्ती विकसित होते. साहजिकच या झपाट्याने बदलणाऱ्या जगाचा रंग आणि वातावरणातील यादृच्छिकतेचा मुलांच्या वागणुकीवरही मोठा परिणाम होतो. त्याच वेळी दुसऱ्या मुलांना अनेक वेळा महागडे छंद असलेल्या आणि आपल्या मैत्रिणींना महागड्या भेटवस्तू देताना पाहून मुलांना आपली देण्याची इच्छा पूर्ण होत नाही, तेव्हा त्यांच्यात वाढणारी मानसिक निराशा आणि दबाव यामुळे राग येतो. याचा अर्थ असा होतो की मुले कधीकधी हिंसक वर्तनातून त्यांच्या आंतरिक भावना व्यक्त करतात. तथापि, कारण काहीही असो, पालक आणि पालकांचे प्रेम, जवळीक आणि भावनिक आधार मुलांच्या वागणुकीत बदल घडवून आणू शकतो. आई-वडील आणि पालकांपासूनचे अंतरही मुलांना घाबरवून सोडते, हे सर्वेक्षणात सिद्ध झाले आहे.





श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# उडता महाराष्ट्र करण्याचा डाव

आधुनिक केसरी

**नाशिक पाठोपाठ सोलापूरमध्येही पोलिसांनी ड्रग्सचा कारखाना उध्वस्त केल्याची बातमी आली. एकाच आठवड्यात राज्यातील दोन महत्वाच्या शहरात चक्क ड्रग्सचे कारखाने उध्वस्त करण्यात आले. नाशिक, सोलापूर यासारख्या शहरात खुलेआम ड्रग्स निर्मिती होते आणि त्याचा कोणाला थांगपत्ताही लागत नाही ही बाब जितकी धक्कादायक आहे तितकीच चिंतनीय आहे. याआधी राज्यात अमली पदार्थांचा साठा जप्त केल्याच्या अनेक बातम्या वाचनात येत होत्या जुलै महिन्यातच छत्रपती संभाजी नगर येथे पोलिसांनी मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांचा साठा (ड्रग्स) जप्त केल्याची बातमी वाचनात आली होती या ड्रग्सची किंमत कैक कोटींच्या घरात होती.**

अर्थात पोलिसांकडून अथवा तपास यंत्रणेकडून ड्रग्सचा साठा जप्त करण्यात आल्याची ती पहिलीच घटना नव्हती त्याआधी पुणे, मुंबई आणि कोकणात अशाप्रकारचे ड्रग्स जप्त करण्यात आले होते आता मात्र थेट ड्रग्स निर्मिती करणारे कारखानेच महाराष्ट्रात सुरू आहेत अशी बातमी आली याचाच अर्थ महाराष्ट्रात ड्रग्सचे मोठे रॅकेट कार्यरत असून ते महाराष्ट्रातील तरुणांना ड्रग्सची लत लावून महाराष्ट्राला उडता महाराष्ट्र करण्याचा प्रयत्न करत आहेत. काही वर्षांपूर्वी पंजाबलाही असाच ड्रग्सचा विळखा पडला होता आणि पंजाब मधील तरुण वर्ग नशेचा आहारी गेला होता म्हणून त्याला उडता पंजाब असे नाव देण्यात आले होते. आता त्याचीच पुनरावृत्ती महाराष्ट्रात करण्याचा डाव तर नाही ना अशी शंका येऊ लागली आहे. अर्थात ड्रग्स तस्कर यात काही प्रमाणात यशस्वी होतानाही दिसत आहे कारण अलीकडे शहरी भागातील उच्चभ्रू तरुण ड्रग्सच्या विळख्यात अडकत असल्याचे दिसून येत आहे. पुण्यात काही दिवसांपूर्वी पोलिसांनी एका रेव्ह पार्टीचा पर्दापाश केला होता. या रेव्ह पार्टीत महाविद्यालयात शिकणारे अनेक विद्यार्थ्यांनी ड्रग्सचे सेवन केल्याची धक्कादायक बाब समोर आली होती. अर्थात अशाप्रकारच्या रेव्ह पार्ट्या राज्यातील मोठ्या शहरात चालू असतात. राज्यात अमली पदार्थ निर्मिती आणि विक्रीवर बंदी आहे असे असताना राज्यात ड्रग्ससह सर्वच अमली पदार्थांची बेधकडक निर्मिती आणि विक्री चालू आहे. ड्रग्स, गांजा यासारख्या अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी ड्रग्स तस्कर इंटरनेटचा वापर करतात. इंटरनेट द्वारे ऑनलाइन ड्रग्सची विक्री केली जाते असे खुद्द पोलिसांनीच सांगितले आहे. अर्थात अमली पदार्थांचा हा विळखा फक्त तरुणांभोवतीच आहे असे नाही तर अमली पदार्थांचा हा विळखा संपूर्ण समाजाला पडत आहे. अमली पदार्थांनी संपूर्ण समाज पोखरून



काढण्याचा डाव या समाज कंटक तस्करांचा आहे म्हणूनच तो चिंताजनक आहे. ड्रग्स तस्करांचा हा डाव जर यशस्वी झाला तर पंजाब प्रमाणे महाराष्ट्रही उडता महाराष्ट्र बनेल आणि संपूर्ण युवा पिढीच उध्वस्त होईल म्हणून ड्रग्स तस्करांचा हा डाव उधळून लावण्याचे मोठे आव्हान पोलीस आणि इतर तपास यंत्रणेपुढे आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी आणि प्रगत राज्यात अमली पदार्थांची खुलेआम निर्मिती आणि विक्री सुरू असून त्यातून नवीन पिढीला व्यसनाधीन केले जात आहे ही शरमेची बाब आहे. अर्थात या ड्रग्स निर्मिती आणि विक्री करणाऱ्यांमागे निश्चितच मोठ्या आसामी असण्याची शक्यता आहे त्याशिवाय ड्रग्स तस्कर इतके मोठे धाडस करणार नाही. आपण कितीही मोठा गुन्हा केला तरी त्यातून आपण सहज बाहेर पडू असा विश्वासच या ड्रग्स तस्करांना असेल म्हणूनच ते अशाप्रकारे बेधडकपणे ड्रग्सची निर्मिती आणि विक्री करत आहेत.

राज्यातील ड्रग्स तस्कर आणि त्यांच्यामागे असलेल्या बड्या आसामिंना गजाआड करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. राज्यातील ड्रग्स तस्करांचे पाळेमुळे खणून काढून तरुण पिढीला वाचवण्याची जबाबदारी पोलिसांची किंवा सरकारची जितकी आहे तितकीच ती पालकांची आणि समाजाची देखील आहे. आपली मुले काय करतात, आपण दिलेल्या पैशांचा उपयोग ते कशासाठी करतात यावर पालकांनी नजर ठेवायला हवी. समाजानेही आपल्या आजूबाजूला काही संशयास्पद हालचाली चालू असतील तर त्याची माहिती पोलिसांना द्यायला. तरुण पिढीला नशेच्या विळख्यातून वाचवण्याची आणि महाराष्ट्राला उडता महाराष्ट्र होऊ न देण्याची जबाबदारी शासन, प्रशासन, पोलीस, पालक आणि समाज या सर्वांचीच आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# नोंदवणारेही बोगस आणि अनेक कामगारही बोगस, बोगस एजंटांचा बोगस कॅम्प !

## एजंटामार्फत आयोजित कामगार कॅम्पच्या चौकशीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यात अनेक ठिकाणी कामगार नोंदणी एजंटानी धुमाकुळ घातला असून शासन योजनांतील अनेक लाभाचे अमिष दाखवून हे एजंट हजारो रुपये घेऊन कामगार नोंदणी पासून तर ऑन लाईन सेवेसह पेट्या - शिष्यवृत्ती असा सेवा बोगस कॅम्प द्वारे पुरवत सर्वसामान्यासह शासनाची लुट करत असून अशाच खामगाव (गोरक्ष) येथील त्या कॅम्प व दलालांची चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विविध संघटनेतर्फे करण्यात आली आहे.

फुलंब्री तालुक्यात अनेक एजंट - दलाल आपल्या अर्थिक लाभासाठी शासकीय योजनेचे अमिष दाखवत सर्वसामान्य जनतेची व शासनाची फसवणुक करत आहे. तुम्हाला सुरक्षा संच पेटी देतो, त्यानंतर ५ लाखाचे घरकुल, तुमच्या मुलांसाठी शिष्यवृती, आरोग्य सुविधा मिळते अशा अशा अमिष दाखवत तुम्ही फक्त थोडासा खर्च करा ही सुविधा आम्ही घरपोच देऊ, जेवनही फुटत मिळते, असे आश्वासन देत १ हजार ते २ हजार रुपये घेऊन अनेक धनदांडगे व इतर व्यवसाय करणारे इसम कामगार नोंदणी कायदयाचा आधार घेत हे एजंट / दलाल कामगार नोंदणी करून घेत आहेत या साठी तुम्ही काम न करता खाजगी गुत्तेदाराकडुन पैसे देऊन कामाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी पैसे खर्च करा नोंदणा आम्ही करतो असे ही सांगतात . आणि हे बोगस कामगार म्हणुन नोंदणी करणाऱ्यांना



पैसे देणे मान्य असते. त्यामुळे अनेक बोगस कामागार दलालाच्या मार्फत बोगस काम करुन घेत आहे . या एजंट दलालांचे कामगार कार्यालयात लागे बांधे असावेत अशी शंका व्यक्त केली जात आहे . त्यामुळे या एजंटा शिवाय कामही होत नाही असे अनेक जण खाजगीत बोलतात . फुलंब्री तालुक्यात अनेक एजंट हे कामगार कार्यालयाच्या अधिका-यांच्या संगनमताने शासनाची फसवणुक व अनेक जन आपले हित साधुन घेत आहे. असाच काही प्रकार खामगाव गोरक्षनाथ येथे दिनांक १८ ऑक्टोबर २०२३ रोजी उघड झाला .१८ ऑक्टोंबर व त्यापुर्वी ग्रा पं कार्यालयात बोगस एजेंट मार्फत कामगार नोंदणी व आरोग्य तपासणी शिबीर सुरु होता . हजारो रुपये घेऊन बोगस कामगार नोंदणी करणारे इसम कोण? ग्रामपंचायत कार्यालयात हा बोगस नोंदणी कॅम्प कसा ? व रक्त तपासण्या साठी रक्त घेणारे लॅब चालक व डॉक्टर बोगस की अधिकृत हे कळणे अवघड आहे . यांच्या मार्फत कामगार तपासणी कॅम्प घेऊन सर्व सामान्यांची लुबाडणुक सुरु आहे. हे वृत्त संकलीत करण्यासाठी गेलेल्या वृत्तपत्र प्रतिनिधीला तुम्हा कोण ? असे म्हणत महिला पदाधिकाऱ्यांनी पत्रकारांशी वाद घालण्याचा प्रयत्न केला जो कॅमेऱ्यात कैद आहे. विशेष म्हणजे सरपंच, उपसरपंच किंवा ग्रामसेवक यांच्या लेखी परवानगी न घेत व त्यांच्या खुर्च्या व पदसिध्द जागेचा वापर करुन संविधानाचे तिन - तेरा करत त्या बोगस कामगारासह शासनाची लुट तालुक्यात सुरु आहे. खामगाव गोरक्षनाथ सह तालुक्यात सुरु असलेल्या बोगस कामगार नोंदणी करणारे एजंटाची व खामगाव ग्रामपंचातय येथे बोगस कामगार नोंदणी कॅम्पची चौकशी व बोगस कामगार नोंदणी करणाऱ्या एजंटवर आपण चौकशी करुन तात्काळ कार्यवाही करावी. अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया डी च्या वतीने तहसील कार्यालय फुलंब्री येथे आंदोलन करण्यात येईल. याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहिल, असे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया डी चे जिल्हाध्यक्ष शिवाजी शेजुळ उपाधक्ष राजु खोतकर यांनी मा. कामगार आयुक्त साहेब, कामगार आयुक्त कार्यालय, विभागीय आयुक्त साहेब, आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, गटविकास अधिकारी साहेब, पंचायत समिती फुलंब्री यांना दिले आहे . तर याच बोगस कामगार कॅम्प बाबत ऑल इंडिया पँथर सेनेतर्फे तहसिलदार फुलंब्री यांना तालुका उपाध्यक्ष प्रल्हाद म्हस्के यांनी निवेदन देऊन कार्यवाहीची मागणी केली.

# भुजबळांना प्रकाश आंबेडकरांचा टोला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठा आरक्षणासाठी उपोषणाला बसणारे मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक मनोज जरांगे पाटील यांची नुकतीच जालन्यातल्या अंतरवाली सराटी गावात विराट सभा पार पडली. मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात मोठ्या संख्येने मराठा समाज एकटवला असून ओबीसी कोट्यातून मराठा समाजाला आरक्षण द्यावे, अशी मनोज जरांगे यांची मागणी आहे. दुसऱ्या बाजूला राज्यातल्या ओबीसी नेत्यांनी मनोज जरांगे यांच्या मागणीला कडाडून विरोध केला आहे. तसेच या सभेपूर्वी राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी जरांगे पाटलांच्या सभेच्या खर्चावरुन प्रश्न उपस्थित केले होते. अंतरवालीतल्या सभेसाठी सात कोटी रुपये कुठून आले? असा खोचक प्रश्न छगन भुजबळ यांनी उपस्थित केला होता. भुजबळांच्या या टीकेला मनोज जरांगे पाटील यांनीही जशास तसे प्रत्युत्तर दिले. गाडीत डिझेल भरण्यासाठी एक-दोन हजार रुपये देऊ का? असा खोचक टोला जरांगे यांनी भुजबळांना लगावला. मराठा आरक्षणावरून छगन भुजबळ आणि मनोज जरांगे पाटील सातत्याने आमने-सामने येत आहेत. दरम्यान, भुजबळांच्या जरांगे यांच्यावरील टीकेला आता वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी उत्तर दिले आहे. जरांगे यांच्या सभेसाठी सात कोटी रुपये कुठून आले? असा प्रश्न विचारणाऱ्या छगन भुजबळ यांना प्रकाश आंबेडकर म्हणाले, हाच उलटा प्रश्न मी विचारला तर चालेल का? प्रकाश आंबेडकर म्हणाले, भायखळ्याच्या भाजी बाजारात साध्या दुकानावर बसणारा माणूस आज पाच ते सहा हजार कोटी रुपयांचा मालक होतो. आता जर हे प्रश्न भुजबळांना विचारले तर त्यांना कसं वाटेल? मला माहिती आहे की मनोज जरांगे पाटील यांच्या सभेला लोकांनी पैसे दिले. परंतु, एक बोट दुसऱ्याकडे दाखवताना तीन बोटे आपल्याकडे आहेत हे छगन भुजबळांना माहिती नसेल, असे वाटते.

# रस्ता ओलांडताना दुचाकीची जबर धडक; महिला ठार

आधुनिक केसरी न्यूज




**लोहा :** आजघडीला राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ चे काम केटीएल कंपनीच्या वतीने चालु असून प्रारंभी वेगात सुरू असलेले काम सध्या कासव गतीने होत असल्याने नांदेड लातूर राष्ट्रीय महामार्गावर अपघातांच्या घटनेत प्रचंड प्रमाणात वाढ झाली. शेताकडून घराकडे जाण्यासाठी रस्ता ओलांडत असलेल्या पारडी येथील ६२ वर्षीय महिला सरपंचास भरधाव वेगातील मोटारसायकलने जबर धडक दिल्याने त्या जागीच ठार झाल्याची दुर्दैवी घटना दि.(१८)रोजी सायंकाळी साडेसहा ते पावणे सात वाजे दरम्यान घडली. अपघात घडताच मोटारसायकल स्वार मोटारसायकल जागेवर सोडून पसार झाला. लोहा शहरापासून अवघ्या तीन किमी अंतरावरील पारडी येथील विद्यमान सरपंच पंचफुलाबाई दत्ता पवार यांचे पारडी शिवारातील बीएसएनएल कार्यालया लगत शेती असून सरपंच पंचफुला पवार या आभाळ दाटून आल्याने सोयाबीन झाकण्यासाठी शेताकडे गेल्या होत्या. शेतीतील कामे आटोपून त्या दि. १८ रोजी सायंकाळी साडेसहा ते पावणेसात वाजताच्या दरम्यान शेताकडून घराकडे जाण्यासाठी निघाल्या होत्या. दरम्यान पारडी नजीक नांदेड लातूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ हा ओलांडत असताना लोह्याकडून नांदेडच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव वेगातील मोटारसायकल क्र. एम एच २६ बी टी २३१५ या मोटारसायकल स्वराने जोराची धडक दिली त्यात महिला सरपंच पंचफुलाबाई दत्ता पवार यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांना लोहा उपजिल्हा उगणालयात उत्तरीय तपासणीसाठी नेण्यात आले होते. मागील नऊ ते दहा महिन्यांपूर्वीच त्या थेट जनतेतून सरपंच म्हणून पारडीचा सरपंचपदी विराजमान झाल्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर दि. १९ रोजी दुपारी १२ वाजता पारडी येथील त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा सामाजिक कार्यकर्ते संभाजी पाटील पवार, पाच मुली, सून, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.




महाराष्ट्र Business Katta









# जोगवा

आधुनिक केसरी

**आई राजा, उदो उदो चा गजर करीत राज्यातील देवीच्या साडेतीन शक्तिपीठांमध्ये मोठ्या उत्साहात नवरात्रौत्सव पारंपरिक पद्धतीने सुरु झालेला आहे, शारदीय उत्सव म्हणजे शरद ऋतूत सुरुवातीला येतो, आज जोगवा विषयी आपण या लेखात माहिती करून घेणार आहोत. प्राचीन काळापासून जोगवा मागण्याची भारतात परंपरा आहे. देवीचा कुलधर्म म्हणून जोगवा मागितला जातो, हा जोगवा मंगळवारी, शुक्रवारी व पौर्णिमेला मागितला जातो,कमीत कमी पाच घरी जाऊन जोगतीण जोगवा मागतात. त्या जोगव्यात तांदूळ, पीठ असे वेगवेगळे पदार्थ घेतले जातात, यालाच जोगवा असे म्हणतात, आज सुद्धा जोगवा मागणाऱ्या जोगतीणला ग्रामीण भागात फार महत्त्व आहे.**

जोगवा मागणारी जोगतीण हातात बांबूची टोपली, कुंकू, भंडारा गळ्यात कवड्याची माळ, कपाळाला भरलेला मळवट, हातात हिरवा चुडा घालते. डोक्यावर पूर्ण पदर घेऊन अनवाणी पायाने देवीची गाणी गात गात जोगवा मागते,

**अनादि निर्गुण प्रगटली भवानी। मोह महिषासुर मर्दिना लागुनी।।* विविध तापांची कराया झाडणी भक्ता लागुनी पावसी निर्वाणी आईचा जोगवा जोगवा मागेन। व्दैत सारुनी माळ मी घालीन ।।*हाती बोधाचा झेंडा घेईन। भेद रहित वारीसी जाईन।। नवविद्या भक्तीच्या करीन नवरात्रा। करून पोटी मागेन ज्ञान पुत्रा।।**

एकनाथ महाराजांनी आईचा जोगवा मागेन हे पद सर्वज्ञात आहे.

जोगवा म्हणजे देवीचा कृपाप्रसाद होय जोगवा म्हणजे भीक नव्हे; जोगवा मागणारी जोगतीण आपल्या कुलाचाराला सुख मिळावे म्हणून जोगवा मागते, घरातील मुलाबाळांना सुख समाधान ,आरोग्य ,ऐश्वर्य, धनसंपत्ती मिळण्यासाठी देवीकडे जोगवा मागितला जातो, मी हा जोगवा मागते वेळेस भेद रहित जोगवा मागेन , सर्व षड्रिपू पासून (मोह,मद,मत्सर,अंहकार ,लोभ, माया) दूर राहिन,सर्व समाजामध्ये समानता असावी ,कोणी लहान- मोठा नाही, असा त्याचा भावार्थ आहे.

संत ज्ञानेश्वर माऊली आपल्या मोठ्या बंधू कडे निवृत्ती नाथा कडे मागने (पसायदान) मागतात. आता विश्वात्मके देवे, हे परमेश्वरा आम्ही जे मागणं मागतो ते आम्हाला दे,

जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो ज्यांचे कर्म जसे असेल; तसे त्यांना फळ दे असं मागणं मागतात, जगद्गुरु संत तुकाराम महाराज परमेश्वराला हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा।।असं मागणं मागतात तसेच जोगतीण सुद्धा भेद रहित जोगवा मागिते; त्यासाठी मी नवरात्रात उपवास,नवस करत आहे अशी ती जोगतीण आपल्या गीतातून सांगते,मी चांगल्या बोधाचा झेंडा हातात घेणार आहे, चांगल्या गोष्टीची उजळणी करणार आहे, म्हणून तर नवरात्रीच्या वेळी जोगवा मागितला जातो.

पूर्वीच्या काळी असणारी जोगतीण आणि सद्याची जोगतीण यांच्यामध्ये फरक आहे , पूर्वी जोगतीण देवीशी एकनिष्ठ राहून सर्वस्व आपले देवीला वाहून देवीच्या नावाने आयुष्य काढत होते, आता काळ बदलत आहे, यामधून अंधश्रद्धा वाढत



आहेत. त्याचे समाजावर विपरीत परिणाम होताना दिसून येत आहेत, देवदास व देवदासी हे देवीच्या सानिध्यात राहत असताना यांची पाऊले वाईट मार्गाने पडत आहेत.या महिला समाजापासून दूर जात आहेत, परंपरा सोडून जाताना दिसत आहेत, कर्नाटक मधील यल्लम्मा देवीसाठी अनेक ठिकाणी देवदासी जन्मभर देवाची सेवा करण्यासाठी सोडल्या जातात. खंडोबा देवाची सेवा करण्यासाठी वाघ्या-मुरळी सोडल्या जातात, नवस फेडण्यासाठी हे कृत्य काही जातीतील लोक करतात, अज्ञान,अंधश्रद्धा या गोष्टी मुळे या घटना घडतात, वरील सर्व पुरुष व महिलांचे जीवन वार्धक्यात खूप त्रासदायक व वेदनादायक जाते, तारुण्यात काही वाटत नाही, परंतु उतार वयात खूप हालअपेष्टा सोसाव्या लागतात, म्हणून श्रद्धा असावी पण अंधश्रद्धा नसावी, महाराष्ट्र शासनाने या प्रथेवर बंदी घातली आहे, तरीही काही प्रमाणात ती चालूच आहे.

आज महिला सर्व क्षेत्रात नाविन्यपूर्ण कार्य करीत आहेत,पुरुषाबरोबर आपली योग्यता कार्यातून दाखवून देतात, अंतराळात झेप घेऊन कर्तृत्व सिद्ध करीत आहेत, म्हणून शिक्षण शिकून सावित्री व्हावे, आता चुल आणि मूल ही संकल्पना काही प्रमाणात मागे पडली आहे, क्रांतीसूर्य महात्मा फुले यांनी एके ठिकाणी म्हटले आहे, इतके अनर्थ एका अविद्येने केले शिक्षण शिकलेल्या महिला सदसद्विवेकबुद्धीने वागतात, खरे -खोटे जाणून घेतात,

निरक्षर महिला अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकून पडतात, इतरांची शिकार होताना दिसतात,शिक्षणा अभावी त्यांनी केलेले चुकीचे संस्कार त्यांच्या मुलांवर आपोआप पडतात,

ते देवदास म्हणून देवाचे भक्त होताना दिसतात,संपूर्ण आयुष्य अंधश्रद्धेत घालवितााात, केस वाढविणे, जटा बांधून ठेवणे, अस्वच्छ राहणे यातून जर्जर रोग जडतात, म्हणून संत गाडगेबाबांनी बहुजन समाज शिकावा त्यासाठी शाळा काढल्या, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर,ताराबाई शिंदे, समाज सेविका अनुताई वाघ, राजर्षी शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, महर्षी धोंडो केशव कर्वे, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, पंडिता रमाबाई, यांनी संपूर्ण आयुष्य महिलांच्या शिक्षणासाठी घालविले, यातून नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठ उदयास आले, म्हणून सर्व महिलांना शिक्षणाची दारे खुली करण्यात आली आहेत, शेवटी एवढे सांगावे वाटते, श्रद्धेचा अतिरेक नको, परत आपण प्रतिगामी आहोत, हे कळून येते, सर्व सण साजरे करा, पण वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून ही अपेक्षा.

प्रा. विठ्ठल बरसमवाड
गोकुळवाडी, ता. मुखेड

# डॉ. नीलिमा सोनावणे : नर्सिंग क्षेत्राला लाभलेले कर्तृत्ववान नेतृत्व



डॉ. दीपाली उमाळे
मुंबई. मो. ९९६९७३९८३३

आधुनिक केसरी

**डॉ.निलिमा सोनावणे यांनी विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील एका छोट्याश्या खेड्यातून प्राथमिक शिक्षण पूर्ण केले.... बोलतात ना! बाळाचे पाय पाळण्यात दिसतात. त्याप्रमाणे लहानपणापासून अभ्यासामध्ये अत्यंत हुशार क्रीडा , लेखन , सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये त्या अव्वल स्थानी होत्या. त्यामुळे घरची आर्थिक परिस्थिती बेताची असूनही आईने शिकून IAS किंवा collector बनण्याचे स्वप्न बघण्यास शिकविले .पण आईच्या अकाली मृत्यूमुळे दुखावलेल्या लहान मनाने आईचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता शिक्षणाची भरारी घेण्याचे मनाशी ठरवले त्यास बाबा व भावंडं यांनी साथ दिली.**

आईचे आजारपण फार दुःखद होते व वेदना काय असतात व त्या करिता सेवा व काळजी घेणे किती महत्वाचे असते ते त्यां चिमुकल्या जीवाला समजले. दुःखाने खचून न जाता डॉ निलीमा यांनी दुखितांचे दुःख निवारण करून रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा आहे असे मानणारा तसेच आर्थिक व सामाजिक संरक्षण देऊन स्वाभिमानाने जीवन जगण्याचा मंत्र देणारा व संपूर्ण समाजास सेवा देता येणारा नर्सिंग व्यवसाय विचारांती निवडला. त्यांनी नर्सिंग चे शिक्षण शासकीय संस्थेतून उच्च मेरिट ने पूर्ण करून स्वतःला परिपूर्ण परिचारिका घडविण्याकरिता मुंबई गाठली व त्या काळातील सर्वात मोठ्या रुग्णालयात नोकरी सुरू केली .अतिउत्तम सेवा दिल्यामुळे सर्व रुग्णांची , वॉर्ड सिस्टर व डॉक्टर यांची आवडती सिस्टर तसेच उत्कृष्ट परिचारिका म्हणून त्यांनी पुरस्कार मिळवले परंतु इथेच न थांबता आपल्या विशेष सेवा अनुभवाचा फायदा गरीब रुग्णांना मिळावा म्हणून डॉ नीलिमा यांनी मुंबईच्या शासकीय कामा व अल्ब्लेस रुग्णालयात नोकरी स्वीकारली . तिथे माता व बाल रुग्णांना सेवा दिली . गरोदर मातांची लोकल मधे , CSMT स्टेशनवर , प्रसूती केली व वेगवेगळ्या विभागात उत्कृष्ठ काम केल्याबद्दल बेस्ट नर्स म्हणून पुरस्कार मिळाले . अश्या प्रकारे 16 वर्ष रुग्ण सेवा तसेच समाजामध्ये कॅन्सर व इतर आजाराबद्दल जनजागृती केली .

गावाकडे जाऊन स्त्रियांना शिक्षण देऊन स्तनाचा कर्करोगाचे लवकर निदान करण्याच्या पद्धती समजून सांगितल्या व त्यांना मुंबई मधे आणून तपास व उपचार करून त्यांचे प्राण वाचविले . झपाटल्यागत काम करीत असताना, त्याच काळात आयुष्यातील नव्या वळणावर त्यांना थोड विसावं लागलं, विवाह होऊन एकत्र कुटुंब , मुलांची जबाबदारी व त्यांच्या शिक्षणामुळे नर्सिंग मधील पुढील शिक्षणाचा विचार केला नाही .SNDT महाविद्यालयात CVTS REFRESHER COURSE मध्ये प्रथम आल्यानंतर शिक्षकांनी विचारले की, तू नर्सिंग मधील ग्रॅज्युएशन का करीत नाही. तेव्हा त्यांनी पुढील शिक्षणाचा विचार केला. व परिचर्या शिक्षण संस्था मुंबई येथे PBBSC नर्सिंग आठ व्यक्तीच्या कुटुंबाची जबाबदारी व मुलांचा सांभाळ करीत लोकल ट्रेन मध्ये अभ्यास करून डॉ नीलिमा यांनी डिस्टिंक्शन मध्ये पूर्ण केले. त्यानंतर परिचर्या महाविद्यालय G. T. रुग्णालय येथे सिस्टर ट्युटर म्हणून प्रवेश केला. नर्सिंग सेवेचा प्रदीर्घ अनुभव असल्यामुळे तसेच विद्यार्थीप्रिय वर्तणुकीमुळे , शिकविण्याच्या विशेष पद्धतीमुळे व संस्थेत प्रशासनाला करीत



कर्तृत्वान नवदुर्गा
भाग : एक

असलेल्या सहकार्याच्या भूमिकेमुळे त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला. आता वेळ होती फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी घ्यायची त्यांनी MSC, M.PHIL , PHD , या नर्सिंग मधील उच्च पदव्या प्राप्त केल्या तसेच PG DIPLOMA IN EDUCATION MANAGEMENT, P. G DEGREE IN DISASTER MANAGEMENT, MBA IN HEALTHCARE MANAGEMENT. असा शिक्षणाचा आलेख हा चढताच होता.

त्याचीच प्रचिती म्हणून 2011 मध्ये असिस्टंट प्रोफेसर करिता MPSC परीक्षेमध्ये प्रथम येऊन त्यांची निवड परिचर्या शिक्षण संस्था मुंबई येथे करण्यात आली व पुढे त्यांनी नर्सिंग शिक्षण हे विद्यार्थांचा सर्वांगीण विकास करून दर्जेदार परिचारिका घडून सामाजिक सेवा देताना सार्वजनिक आरोग्यावर लक्ष केंद्रित केले. जीवघेणे आजारावर संशोधन तसेच जनजागृती करण्याकरिता सामाजिक चळवळ उभी केली. वेगवेगळ्या परिषदा, कार्यशाळा, सेमिनारमधून विद्यार्थांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या प्रगतीचे मार्ग मोकळे केले. याची दखल घेऊन समाजाच्या वेगवेगळ्या स्तरांमधून त्यांच्या शैक्षणिक , आरोग्य , संशोधन व सामाजिक कार्याकरिता 20 पेक्षा जास्त स्थानिक , राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. डॉ. निलिमा यांचेकडे लीडरशिप व वक्तृत्व असल्यामुळे त्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदामध्ये वक्ता व मार्गदर्शक म्हणून आमंत्रित असतात. नर्सिंग व सामाजिक प्रश्नावर स्पष्टपणे आपले मत मांडण्याची त्यांची ख्याती आहे , व नर्सिंग व्यवसायात व सामाजिक चळवळीमध्ये काम करीत असल्यामुळे त्यांचा वेगवेगळ्या क्षेत्रांतील चाहता वर्ग आहे .परिचर्या शिक्षण संस्थेमध्ये प्राचार्या म्हणून कार्यरत असताना त्यांनी शिक्षणाचा दर्जा उंचावला व संस्थेला आंतरराष्ट्रीय स्तरावर मानसन्मान मिळवून दिला . विद्यार्थ्यांकरिता चोवीस तास उपलब्ध असणाऱ्या प्राचार्या व कोणतेही प्रश्न सोडविण्यासाठी तत्पर म्हणून निलिमा मॅडम यांची ओळख विद्यार्थी वर्गात रुजली आहे. त्यांनी कोरोना महामारी मध्ये विद्यार्थ्यांकडून शंभर टक्के कोविड रुग्णसेवा करून घेतली. रोज स्वतः हजर राहून सर्व विद्यमान शिक्षकांच्या मदतीने ऑनलाईन शिक्षण देऊन १००,% संस्थेचा निकाल लावण्याचे श्रेय प्राचार्या म्हणून त्यांना जाते. यास्तव त्यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार मिळाला.

16 वर्ष रुग्ण सेवा व 18 वर्ष शैक्षणिक सेवा दिल्यानंतर व नर्सिंग मधील उच्च शिक्षण प्राप्त केल्यानंतर त्यांनी प्रशासनामध्ये जाण्याचे ठरविले व अत्यंत मेहनतीने अभ्यास करून वयाच्या 50 व्या वर्षी महाराष्ट्रातील नर्सिंग चे सर्वात उच्च असलेल्या सहा.संचालक नर्सिंग, आरोग्य सेवा महाराष्ट्र राज्य ह्या परीक्षेमध्ये संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम येण्याचा मान मिळवून आज त्या पदावर विराजमान आहेत. नवरात्र उत्सवानिमित्त त्यांच्या कार्यास आधुनिक केसरीचा सलाम..!

# घाटनदेवी

आधुनिक केसरी

अखंड उत्तर महाराष्ट्रात विविध पंथीय साधु-संतांच्या पदस्पर्शाने असा इगतपुरी तालुका पावन झाला आहे त्याच बरोबर प्रांतः स्मरणीय घाटनदेवीच्या सानिध्यामुळे तर त्या पावित्र्यात अधिक भर पडली आहे. राज्याची चेरापुंजी आणि सर्वाधिक पावसाचा प्रदेश अशी ख्याती असलेल्या उत्तर महाराष्ट्राचे प्रवेशद्वार अशी जुनी ओळख असलेल्या आणि मुंबई -आग्रा महामार्गावर नाशिककडे जाताना अत्यंत नागमोडी वळणाचा कसारा घाट लागतो हा घाट चढून आल्यावर लगेचच घाटनदेवीचे भव्य असे मंदिर लागते येथुनच नाशिक जिल्ह्याचे प्रवेशद्वार आहे आणि समोरच निसर्गरम्य उंटदरीचे मनमोहक दृश्य दिसते. इगतपुरी तालुक्यात परिसरात प्रवेश करतानाच थळ घाटाच्या पायथ्याशी शिवकालीन काळापासून प्राचीन असे देवीचे मंदिर आहे. घाटात देवीचे स्थान असल्याने घाटनदेवी असे म्हणून ते प्रसिद्ध झाले आहे. घाटनदेवीचे रूप अत्यंत विराट आहे. संकटसमयी भक्तांच्या मदतीला धावणारी व नवसाला पावणारी म्हणून घाटनदेवीचा महिमा आहे. घाटनदेवी मातेची श्रीदुर्गा सप्तशतीत शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघटा, कृष्णांडा, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागिरी, महासिद्धी, महागौरी व रिद्धी-सिद्धी असे विविध रूपे आहेत. यातील पहिले रूप म्हणजे शैलपुत्री म्हणजेच घाटनदेवी माता होय. प्राचीन माहितीनुसार देवी वज्रेश्वरीहून भीमाशंकरकडे येण्यास निघाली, त्या वेळेस रस्त्यात देवीने या ठिकाणी विश्रांती घेतली व ती येथेच स्थिर झाली, तीच ही घाटनदेवी. शैलाधिराज तनया म्हणून या देवीची मोठी ओळख आहे. वज्रेश्वरीहून भीमाशंकरकडे प्रयाण करीत असताना देवी येथे विश्रांतीसाठी थांबली, अशी प्राचीन माहिती असली, तरी आजही तीच खरी आहे, असे येथे आल्यावर वाटते. नैसर्गिक वातावरण आणि सुंदर परिसराने मोहित होऊन देवीने येथे मुक्काम ठोकला, अशी पुरातन कथा आहे. या मंदिरासमोरच उटदरी नावाचे सृष्टीसौंदर्याने नटलेले ऐतिहासिक स्थान आहे. कल्याणचा खजिना लुटून



उंट याच दरीत लोटले होते. यामुळे या दरीला उंटदरी असे नाव पडले. त्याचा अपभ्रंश उटदरी असा झाल्याचे इतिहासात नमूद आहे. कोणताही सह्रदयी माणूस या ठिकाणी आल्याबरोबर अगोदर सृष्टीसौंदर्याकडे लक्ष देतो. विशेषतः मुंबई आणि नाशिककडे ये-जा करणारे वाहनातील प्रवासी तर इतके भारावतात, की त्यांना सौंदर्यक्षण टिपून घेण्याचा मोहच आवरता येत नाही. वैदिक काळापासून देवीची येथे स्थापना झाल्याचे नमूद आहे. घाटनदेवीचा पूर्वी जुन्या ठिकाणी तांदळा होता, तो जसा होता तसाच आजही कायम आहे. पूर्वापार असलेले जीर्णमंदिर पडून गेल्याने गावातील ज्येष्ठ श्रेष्ठ भाविकांनी विचार करून लगेच नव्या मंदिराच्या कामास सुरवात केली. दोन ते तीन वर्षांच्या अथक परिश्रमानंतर मंदिराची उभारणी करण्यात आली आहे.२१ एप्रिल १९८० ला देवी मूर्तीची प्रतिष्ठापना ज्येष्ठ समाजसेवक ब्रिजलाल रावत यांच्या हस्ते करण्यात आली. हे देवस्थान १९९६ मध्ये धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत करण्यात आले आहे. विश्वस्त म्हणून नऊ जणांची टीम कार्यरत आहे. नवरात्रोत्सवात या ठिकाणी नऊ दिवस यात्रा भरते. म्हणूनच राज्याच्या विविध भागांतून भाविक दाखल होतात. येथे भाविकांची पहाटे पाचपासून रात्री दहापर्यंत दर्शनासाठी गर्दी होत असते. नवसाला पावणारी घाटनदेवी म्हणून देवीची ख्याती आहे. आपली मनोकामना पूर्ण झाल्यावर येथे प्रत्येक भाविक पितळी घंटा देवीचरणी वाहतो; तर बरेच भाविक येथे जाऊळ, सत्यनारायण पूजन, दुर्गासप्तशती पठण, पारायणे करून नवसाची पूर्ती करीत असतात. प्रत्येक निवडणुकीसाठी प्रचाराचा नारळ येथेच वाढविण्यात येत असतो.

त्यामुळे घाटनदेवी माता तालुक्याचे ग्रामदैवत बनले आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात येथे अहमदनगर, राजूर, अकोले, कसारा, शहापूर, जव्हार, मोखाडा, ठाणे, कल्याण, मुंबई, जळगाव, भुसावळ, अमळनेर, चोपडा, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नाशिक, मालेगाव आदी भागांतील भाविकांची उपस्थिती लक्षवेधी असते.

विक्रम पासलकर
इगतपुरी, नाशिक

# हीच ललिता माता: आपली आदर्श माता!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**आश्विन शुद्ध पंचमी ही आश्विन महिन्याच्या शुद्ध पक्षातील पाचवी तिथी आहे.ललिता पंचमी हे व्रत धनप्राप्ती, विद्या प्राप्ती तसेच सर्व इच्छा पूर्ती होण्यासाठी केले जाते. या दिवशी स्त्रिया रात्री एकत्र जमून देवीची गाणी, आरती करतात. स्वतःच्या परसदारी तयार झालेल्या कोवळ्या काकड्या आणि दूध असा रात्री प्रसाद म्हणून खाण्याची पद्धत आहे. या पूजाविधानात पुष्पांजली समर्पण झाल्यावर गंधाक्षता युक्त व साग्र अशा अठ्ठेचाळीस दुर्वांची एक याप्रमाणे अठ्ठेचाळीस दुर्वांच्या जुड्या करून मातेला अर्पण करण्याची प्रथा आहे.**

आपले मूल आत्मनिर्भर व्हावे, सुशिक्षीत, सुसंस्कृत व्हावे, हे प्रत्येक मातेचे स्वप्न असते. यासाठी ती प्रसंगी वाईटपणादेखील घेते. रामायणात वनवासाला निघालेले श्रीराम, आपल्याला कर्तव्याची जाणीव करून दिल्याबद्दल कैकयी मातेला वंदन करून निघतात. याउलट भरत कैकयीला "माता न तू वैरिणी" म्हणून संबोधतो. मात्र, कैकयी मातेने वाईटपणा घेतला नसता, तर श्रीराम प्रभू अयोध्येचे राजा होऊन केवळ राज्य करण्यात मग्न झाले असते. त्यांचा अवतार दुष्टांचा नायनाट करण्यासाठी झाला होता. या अवतार कार्याची अप्रत्यक्षपणे जाणीव कैकयी मातेने करून दिली. म्हणून दंडकारण्यात चौदा वर्षे खडतर वनवास भोगून प्रभू श्रीरामांनी रावणासकट सर्व दैत्यांचा नायनाट केला आणि रामराज्य स्थापन केले.

ललिता पंचमी पूजाः ललिता पंचमी ही शारदीय नवरात्र उत्सवातील महत्त्वाचा दिवस मानली गेलेली तिथी आहे. आश्विन महिन्याच्या शुक्ल पक्षातील पंचमी तिथीला ललिता पंचमी म्हटले जाते. नवरात्रोत्सवात ललिता पंचमी हे व्रत विशेष महत्त्वाचे आहे. याला उपांग ललिता व्रतही म्हणतात. अश्विन शुद्ध पंचमीच्या दिवशी ललिता देवीची पूजा करतात. या पूजाविधीमुळे विद्या, धन, संपत्ती व प्रतिष्ठा प्राप्त होते. श्री ललिता पंचमी म्हणजे आश्विन शुक्ल पंचमीला उपांग ललिता व्रत करावयाचे आहे. हे काम्य व्रत आहे. ललिता देवी ही या व्रताची देवता आहे. नवरात्रीच्या पाचव्या दिवशी ललिता पंचमी साजरी केली जाते. या दिवशी भक्त व्रत व पूजा पाठ करतात. व्रताचे स्वरूप- या दिवशी नवरात्र उत्सवानिमित्त देवीच्या उपांग ललिता या रूपाची पूजा केली जाते. करंडा या भांडे प्रकारावरील केवळ झाकणाची प्रतीकरूप पूजा या दिवशी केली जाते. ललिता देवीला दूर्वांचा हार अर्पण केला जातो. देवीच्या नैवेद्याला खीर, लाडू, घारगे तयार करतात. भोपळ्याच्या घारग्याचे वन देण्याची पद्धतीही दिसून येते. रात्री जागरण आणि देवीच्या कथेचे श्रवण केले जाते. दुसऱ्या दिवशी सकाळी व्रताचे उद्यापन केले जाते. हे व्रत स्त्री आणि पुरुष दोघेही करतात. पौराणिक मान्यता- पौराणिक मान्यतानुसार या दिवशी ललिता भांडा नावाच्या राक्षसाचा वध करण्यासाठी प्रकट झाली होती. हा राक्षस कामदेवाच्या राखेने उत्पन्न झाला होता.

या दिवशी भक्त षडशोपचार विधीने ललिता देवीचे पूजन करतात. ललिता देवीसह स्कन्दमाता आणि महादेवाची शास्त्रानुसार पूजा केली जाते. या दिवशी व्रत करणे अत्यंत फलदायी ठरतं. मान्यता आहे की या दिवशी देवीची आराधना केल्याने देवीची कृपा मिळते आणि जीवनात सुख-समृद्धी आणि शांती नांदते.

महत्त्व- आदिशक्ती आई ललिता दस महाविद्यांपैकी एक आहे. पंचमीचं व्रत भक्तांसाठी शुभ फलदायी आहे. यादिवशी पूजा आराधना केल्याने देवीचा आशिर्वाद प्राप्त होतो. जीनवात सुख आणि समृद्धी येते. पौराणिक मान्यतेनुसार आदिशक्ति, त्रिपुर सुंदरी, जगत जननी ललिता मातेच्या दर्शन मात्र केल्याने सर्व कष्टांचे निवारण होते. ललिता पंचमी व्रत समस्त सुख प्रदान करणारी आहे. देवीची पूजा शक्ती प्रदान करते. देवी ललिता- शक्तिची देवी ललिताचे पुराणात वर्णन आढळते. ज्यानुसार पिता दक्ष द्वारा अपमानित झाल्यावर जेव्हा दक्ष पुत्री सती आपले प्राण उत्सर्ग करते तेव्हा शिव त्यांचं पार्थिव देह आपल्या खांद्यावर घेऊन चारी दिशेत फिरतात. ही महाविपत्ति बघून भगवान विष्णू चक्राने सतीचा देह विभाजित करतात. नंतर भगवान शंकराच्या हृदयात धारण झाल्यामुळे हिला ललिता नावाने ओळख मिळते. ललिता देवीचं प्रादुर्भाव तेव्हा होतं जेव्हा ब्रह्माद्वारा सोडण्यात आलेल्या चक्रामुळे पाताळ समाप्त होऊ लागतो. ही स्थिती बघून ऋषी-मुनी घाबरु लागतात आणि संपूर्ण पृथ्वी हळू-हळू जलमग्न होऊ लागते. तेव्हा सर्व ऋषी माता



ललिता देवीची उपासना करु लागतात. त्यांच्या प्रार्थनेला प्रसन्न होऊन देवी प्रकट होते आणि हे विनाशकारी चक्र थांबवते. सृष्टीला पुनः नवजीवन प्राप्त होते. पूजा पद्धत- एखाद्या करंडकाचे झाकण हे हिचे प्रतीक मानून पूजेला घेतात. सकाळी आघाड्याच्या काडीने दंतधावन करतात. केळीचे खांब आणि पुष्पमाला यांनी देवीसाठी मखर बांधतात. ललितादेवीचे ध्यानमंत्र असे आहेत- **"नील कौशेयवसनां हेमाभं कमलासनाम। भक्तांना वरदां नित्यं ललितां चिन्तयाम्यहम्।।"**

(अर्थः कमलावर अधिष्ठित, निळे, रेशमी वस्त्र परिधान करणारी, सुवर्णकांतीची, भक्तांना नित्य वर देणारी अशा ललितेचे मी चिंतन करतो.)

या पूजाविधानात पुष्पांजली समर्पण झाल्यावर गंधाक्षता युक्त व साग्र अशा ४८ दुर्वा ललितेला वाहतात. नैवैद्यासाठी लाडू, वडे, घारगे वगैरे पदार्थ करतात. पूजेच्या शेवटी घारग्यांचे वायन-वाण देतात. रात्री जागरण व कथा श्रवण करतात. दुसऱ्या दिवशी ललितादेवीचे विसर्जन करतात. मातृरूपाने देवी आपले लालन-पालन करते, म्हणून तिला ललिता म्हटले आहे. देवीच्या मातृरूपाचा गौरव करण्याचा दिवस म्हणजे ललिता पंचमी, तो साजरा कसा करायचा ते जाणून घेऊ!

नुकतीच शारदीय नवरात्र सुरू झाली असून १९ ऑक्टोबर रोजी नवरात्रीचा पाचवा दिवस आहे. हा दिवस ललिता पंचमी नावे साजरा केला जातो. पाचव्या दिवशी देवीच्या मातृवत्सल रूपाची पूजा केली जाते. माता लालन-पालन करते, म्हणून तिला ललिता म्हटले आहे. आई आपल्या मुलाचे वाईट कधीच चिंतू शकत नाही. असे म्हणतात,

**"कुपुत्रो जायेत् क्वचिदपि कुमाता न भवति !!"**

अर्थात संतती वाईट असू शकते, परंतु आई कधीच वाईट नसते. म्हणूनच तिला प्रेमरूपिणी, प्रेमांकित जननी म्हटले आहे.

यावरून बालपणी ऐकलेली एक गोष्ट आठवून पहा- एक मुलगा अतिशय खोडकर असतो. कोणाची मस्करी कर, कोणाच्या खोड्या काढ, कोणाच्या वस्तू पळव अशा सगळ्या त्याच्या वाईट सवयी. रोज शाळेतून त्याची तक्रार आईच्या कानावर पडत असे. आई त्याची समजूत काढते, चांगले संस्कार घालते परंतु एक चूक करते. लोकांसमोर त्याचा अपमान होऊ नये म्हणून पाठीशी घालते. त्याच्या चुका पदरात घेते. मात्र, आईच्या चांगुलपणाचा मुलगा फायदा घेत एवढा बिघडतो, की मोठेपणी तो गावगुंड म्हणून ओळखला जातो. आई त्याची मनधरणी करते. त्याला सन्मार्गाला लावू पाहते. परंतु, हाताबाहेर गेलेला मुलगा आईचे ऐकूनही घेत नाही. एकदिवस गावात मारामारी होते, त्यात मुलाच्या हातून रागाच्या भरात खून होतो. पोलिस त्याला बेड्या ठोकतात आणि तुरुंगात टाकतात. आई रडत-ओरडत तुरुंगात पोहोचते. पोलिसांना विनवण्या करून मुलाची भेट घेते. त्याच्यासमोर खूप रडते. मात्र, पाषाणहृदयी मुलावर काहीच परिणाम होत नाही. भेटण्याची वळ संपते. त्याआधी मुलगा आईला जवळ बोलावतो आणि काहीतरी सांगण्याच्या निमित्ताने तुरुंगाच्या दाराच्या सळ्यांमधून आत आलेला आईचा कान कचकचून चावतो. आई विव्हळते. ओरडते. तिच्या कानाला रक्ताची धार लागते. ती आश्चर्यचकित होऊन मुलाकडे पाहते, त्यावर मुलगा तिला म्हणतो, "माझ्या चुका पदरात घेण्यापेक्षा वेळीच मला दोन धपाटे घातले असते, तर आज मी तुरुंगात नसतो." तात्पर्य- मुले कृतघ्न होऊ शकतात, आई नाही! म्हणूनच ललितामातेला आदर्श मानतात. ती समस्त जगावर वात्सल्याचे छत्र धरते, परंतु चुकांची शिक्षा भोगण्यासाठी रखरखीत उन्हाचे चटकेही देते.

सुख-समृद्धीसाठी नवरात्रीतील पंचमी तिथीला करावी. १९ ऑक्टोबर रोजी ललिता पंचमी आहे. या तिथीला उपांग ललिता व्रत केले जाते. या दिवशी ललिता देवीची पूजा केली जाईल.

# विद्यार्थ्यांनो नेहमी चांगले आदर्श जोपासा...



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**आमची मुले अभ्यासच करत नाहीत!शहरी व ग्रामीण भागातील बहुतांश विद्यार्थ्यांच्या पालकांच्या मनात ही एकच खंत दाटली आहे आणि ही खंत खरीही आहे. आजचे विद्यार्थी मन लावून अभ्यास न करता मोबाईल मध्ये जास्त रमलेले दिसतात. शाळा सुटल्यावर दप्तर घरात ठेवून उनाडक्या करणाऱ्या मित्रांबरोबर हिंडणे, फालतू गप्पा मारणे, मोबाईलवर गेम्स खेळणे, सेल्फी काढून इन्स्टाग्रामवर व फेसबुकवर शेअर करणे, लाईक्स व कॉमेंट्स पाहणे आणि मौल्यवान वेळ वाया घालवणे. हा प्रकार सगळीकडेच सुरू आहे. असे का घडत आहे? आजचे विद्यार्थी अभ्यासापासून लांब का पळत आहेत?याचे एकमेव कारण म्हणजे जीवनध्येय न ठरवणे आणि ध्येयवेडेपणाचा अभाव असणे.**

तीस वर्षांपूर्वी शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थी हे जीवन ध्येय ठरवून त्याप्रमाणे मार्गक्रमण करायचे. मन लावून एकाग्रतेने अभ्यास करायचे.वाईट संगतीत व वाईट मित्रांसंगे न राहता अभ्यासावर लक्ष केंद्रित केले जायचे. सायंकाळी मैदानी खेळ खेळून शरीर निरोगी व तंदुरुस्त ठेवले जायचे. आपल्या आदर्शांना डोळ्यासमोर ठेवून तसे आचरण पण केले जायचे. आजचे विद्यार्थी या मापात कोठेही बसत नाहीत. जीवनात काहीतरी चांगले बनण्याचा संकल्प करायचा असतो हेच त्यांना माहीत नाही. डोळ्यात तेल घालून अभ्यास केल्यास,खूप मेहनत केली की जीवनाला योग्य आकार मिळतो हे आजच्या विद्यार्थ्यांना वारंवार समजावून सांगितले तरच ते अभ्यास करतील. नाहीतर आजच्या पिढीला वाईट संगत गिळंकृत करून टाकेल. गावागावांत अशी एक टोळका गॅंग आहे जी व्यसने करण्यात पटाईत आहे.रोज रात्री अंधारात एकत्र येऊन व्यसनांचा आनंद लुटतात. शाळकरी मुलांना चुकीचे सांगून त्यांना बिघडवतात.अशा टोळका गॅंग मधील तरुणांच्या आईवडिलांना त्यांच्या मुलांचे कारनामे सांगितले तरी ते कानाडोळा करतात. आमचा पोरगा तसा नाही असे सांगतात.

म्हणून आजच्या विद्यार्थ्यांना कळकळीने सांगावे वाटते की आपली संगत चांगली ठेवा.अभ्यास करणाऱ्या मुलांबरोबर राहा. मोबाईलचे वेड डोक्यातून काढून टाका.जीवनात नेहमी चांगला आदर्श ठेवा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर अठरा अठरा तास अभ्यास करायचे.त्यांनी अनेक अभ्यासक्रमांच्या उच्च पदव्या मिळवल्या. शिक्षणाप्रती त्यांची निष्ठा आदर्शवत होती. शिक्षणाच्या जोरावर त्यांनी भारतात सामाजिक क्रांती केली. त्यांचा आदर्श आजच्या विद्यार्थ्यांनी बाळगला तर जीवनाचे सोने होईल. मिसाईलमॅन डॉ.ए.पी.जे.अब्दूल कलाम यांनाही पुस्तके वाचण्याचा व निश्चित केलेले जीवन ध्येय गाठण्याचा, देशासाठी अलौकिक असे कार्य करण्याचा छंद जडला होता.या महामानवांचा आदर्श घेऊन आजच्या विद्यार्थ्यांनी तसे मार्गक्रमण केले तर नक्कीच जीवनाचे सोने होईल.जीवनात ध्येयवेडेपणा फार गरजेचा आहे याचा थोडाही विसर होऊ देऊ नका.फक्त आपल्या आईवडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवा.आपले आदर्श हे चांगले व अलौकिक व्यक्तिमत्वाचे व्यक्ती असावेत.चित्रपट कलाकार अथवा क्रिकेट खेळाडू आपले आदर्श होऊ शकत नाहीत. कारण हे कलाकार व खेळाडू गुटखा खाण्याची व रमी सर्कल वर रमी खेळण्याची जाहिरात करुन नव्या पिढीला बिघडवत आहेत. आपले कष्टाळू आईवडील आपले आदर्श असतात.आपल्या गावातील उच्चशिक्षित आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मोठे यश संपादन करणारे लोक आपल्या सर्वांचे आदर्श असतात. त्यांचा आदर्श बाळगला व तसे मार्गक्रमण केले की आपल्या जीवनाला कलाटणी मिळते.चांगले आदर्श बाळगण्याचा ध्येयवेडेपणा नक्कीच जीवनाला कलाटणी देत असतो.म्हणून आजच्या विद्यार्थ्यांनी जीवनात नेहमी चांगले आदर्श बाळगावेत.

# सोशल माध्यमे जागरूकतेची साधने ठरावीत



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**सोशल माध्यमं gh लोकांच्यामध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी असतात असली पाहिजेत पण दुर्दैव असं आहे कि हल्ली जागरूकता कमी आणि फसवणुकीचे प्रकार जास्त प्रमाणात होत आहेत. हे अपयश नेमकं कोणाच आहे. फसवणुकीचे अनेक प्रकार असलेतरी देखिल अंतिमतः ती आपल्यासाठी त्रासदायक ठरते .कोणत्याही प्रकारच्या फसवणूकीला आपलाच निष्काळजीपणा जबाबदार असतो. आपण जागृत नसणं हेच मुख्य कारण असते. योग्य पद्धतीने खातरजमा केलीच पाहिजे. आपण फार काही खातरजमा न करता क्षणात विश्वास ठेवतो आणि परिणाम स्वरूप आपण फसले जातो. शक्यतो जास्तीत जास्त उच्च शिक्षित लोक सोशल माध्यम वापरतात.**

तरही सोशल मीडिया मध्ये फसवणुकीचे प्रकार वाढीस लागले आहेत. ही नक्कीच गंभीर स्वरूपाची बाब आहे. पण या मध्ये जागृती हा एकमेव बचावाचा अंतिम उपाय आहे. म्हणून सोशल माध्यम हे सध्या फसवणुकीच्या विळाख्यात आहे. असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. पण आपली जागरूकता हा आपला बचाव आहे. मेसेज करून कोणीही बनावट किंवा सत्य खात्यावर आपल्या सोबत चर्चा करतय किंवा पैसे मागतय हे आपल्याला खात्री होई पर्यंत किंवा सत्यता पडताळून पाहील्याशिवाय अंतिम निर्णय घेऊ नये. फेसबुक वर अनेक खोटी किंवा अनेक वेगवेगळ्या नावांनी खाते निर्माण करून काही वृत्ती प्रवृत्ती कार्यरत आहेत आणि अशा वृत्ती प्रवृत्ती कडुन आपली फसवणूक होऊ शकते याबाबत सदैव सचेत भूमिकेत असलं पाहिजे. आपल्याला आवश्यक ती काळजी दक्षाता घेता आली पाहिजे हि आपली जबाबदारी असुन हिच आपल्यासाठी मोठी खबरदारी आहे. आपल्याला सोशल माध्यमावर अनेक ओळखितील अथवा अनोळखी खात्यावरून संदेश येत असतात अशा वेळी आपण किती आणि कसा प्रतिसाद देतो त्यानुसार आपली फसवणूक ठरत असते. आपण नेहमीच सोशल नेटवर्कर सज्जग असलं पाहिजे आपला बचाव करण्यासाठी काही उपायत्मक बाबी करणं गरजेचं आहे त्या मध्ये सर्व प्रथम आपल्याला मेसेज आला कि तो मेसेज कोणाचा आहे खरा आहे कि बनावट खात्यावरुन आहे याची खात्री करण्यासाठी सोशल नेटवर्कर अगोदर मोबाईल नंबर मागणी करण आणि मोबाईल वर प्रत्यक्ष बोलणं व जो पर्यंत बोलणं होऊन खात्री होत नाही तोपर्यंत जास्तीचा वार्तालाप न करणे किंवा गोपीनिय महिती न सांगणं तसेच आर्थिक जोखिम न उचलण हे महत्त्वाचे आहे आणि या मध्ये जो पर्यंत लोक जागृती होणार नाही तो पर्यंत हे असे प्रकार थांबणार नाहीत.प्रत्येक बाबीचे दोन परिणाम असतात. एक चांगला परिणाम आणि एक वाईट परिणाम पण वाईट परिणाम होऊ देयचा नसेल तर आपण जागरूक आसल पाहिजे. सोशल माध्यम वापरताना आपण अनेक ठिकाणी पाहतो कोणतरी कोणाच तरी नाव वापरून गैर कृत्य करत असत. किंवा कुणाचं तरी नाव वापरून परस्पर खात काढुन त्याचा वापर अनेकांशी चर्चा करण्यासाठी होताना आपण पाहतोय आणि असा प्रकार आपल्या सोबत झाला तर आपणं सजग असलं पाहिजे. या मध्ये पैशाची मागणी झाली तर पैशाची मागणी करणारे ओळखितील आहेत काय याबद्दल प्रथम आपण खातरजमा केली पाहिजे तसेच खात्री होई पर्यंत विश्वास सिद्ध होईपर्यंत आपण अंतिम निर्णय घेता कामा नये. खरंच आपण असं करतो का तर नाही करत.मग आशा वेळी नेमकी आपण काय खात्री करतो. सत्यता काय पडताळणी करतो.तर काहीच नाही. आपण क्षणात निर्णय घेतो आणि फसतो. खर पाहिलं तर आपण एखाद्याला खारया अर्थाने समोरा समोर मदत करू शकतो का तर नक्कीच नाही. मग आपण काही क्षणात शोशल माध्यमात काहीच खात्री न करता कसं काय मदत करण्यासाठी उतावीळ असतो याचा पण विचार झाला पाहिजे. समाजा एखाद्या सोशल मीडिया तील खात्यावरूर संदेश मिळाला तर आपण प्रथम काय केलं पाहिजे. सगळ्यात महत्वाची बाब अगोदर मोबाईल नंबर मागितला पाहिजे. दोन मिनिटांचा वेळ काढून प्रत्यक्ष फोन करून बोलुन घेऊन खात्री केली पाहिजे आणि खात्री होई पर्यंत पुढे संदेश किंवा चर्चा करू नये. समोरून किती ही लिहल तरी आपण फक्त मोबाईल नंबर मागितला पाहिजे आणि प्रत्यक्ष बोलणं होईपर्यंत विश्वास ठेवला नाही पाहिजे. सोशल माध्यम आज जरी प्रभावी व जीवन आवश्यक असली तरी आपण ज्या पद्धतीने त्याचा वापर करतोय त्यामध्ये सुद्धा आर्थिक फसवणूक करण्यासाठी विविध वेगवेगळ्या पद्धतीचे बनावट खाते उघडले जात आहेत. हे वास्तव असून ही गंभीर अशी समस्या समोर येत आहे. अशा वेळी आपली जागरूकता हिच आपल्या बचावाची प्रभावी बाजू आहे. लोक जागृती निर्माण होऊन प्रत्येकाने आपला स्वतःचा बचाव करण्यासाठी जागरूक राहण्याची आवश्यकता आहे. खऱ्या अर्थाने सोशल मध्यम हे फक्त जागरूकता निर्माण होण्यासाठी उपयोगी ठरल पाहिजे. फसवणूक मग कोणाचीही आणि कोणत्याही प्रकारची कोणत्याही परिस्थितीत सोशल माध्यमातून होता कामा नये सोशल माध्यम ही फसवणुकीचे नाही तर जागृतीचे माध्यम ठरलं पाहिजे.

# भव्य अमृत कलश एकत्रीकरण जिल्हास्तरीय कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 'माझी माती माझा देश' अर्थात 'मेरी माटी मेरा देश' या राष्ट्रव्यापी उपक्रमांतर्गत आयोजित जिल्हास्तरीय कार्यक्रमात चंद्रपूर जिल्ह्यातील १७ नगर परिषद / पंचायत व १७ मनपा प्रभाग क्षेत्रातून संकलित केलेली माती अमृत कलश यात्रेव्दारे महापालिका हुतात्मा स्मारकात वाजतगाजत आणून मुख्यालय स्तरावर अमृत कलशांचे एकत्रीकरण मान्यवरांच्या हस्ते १८ ऑक्टोबर रोजी करण्यात आले. या कार्यक्रमात चंद्रपूर जिल्ह्यातील १७ नगर परिषद / नगर पंचायत यांच्या कलशातील माती जिल्हाधिकारी यांच्याकडे तर चंद्रपूर मनपा हद्दीतील १७ प्रभागातील कलशातील माती प्रतीकात्मक स्वरूपात आयुक्त विपीन पालीवाल यांच्याकडे देण्यात आली. नंतर सर्व कलशातील माती एकत्र करून १७ नगर परिषद / नगर पंचायत यांचा १ तर चंद्रपूर मनपाचा १ कलश तयार करण्यात आला. हे दोन्ही कलश कलश २७ ऑक्टोबर, २०२३ रोजी ऑगस्ट क्रांती मैदान मुंबई येथे होणाऱ्या कार्यक्रमात



नेण्यात येणार असून तदनंतर शासनाच्या माध्यमातून ०१ नोव्हेंबर, २०२३ रोजी दिल्ली येथे होणाऱ्या कार्यक्रमात नेण्यात येणार आहे.

या अभियानाच्या पहिल्या टप्प्याचे यशस्वी नियोजन करीत 'वसुधा वंदन', 'शिलाफलकम्', 'पंचप्रण शपथ', 'शहीद वीरांच्या कुटुंबियांचा सन्मान' असे नानाविध उपक्रम भव्यतम स्वरुपात राबविण्यात आले होते. दुसऱ्या टप्प्यात चंद्रपूर जिल्ह्यात अमृत कलशाची उत्सवी स्वरुपात यात्रा काढून विभागांतील घरोघरी जाऊन या कलशांमध्ये घराघरांतील, विभागीय परिसरातील माती संकलित करण्यात आली. भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या या अमृत कलश एकत्रीकरण सोहळ्याप्रसंगी जिल्हाधिकारी विनय गौडा, आयुक्त विपीन पालीवाल यांच्या हस्ते हुतात्मा स्मारक येथे पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. याप्रसंगी उपायुक्त मंगेश खवले यांच्याद्वारे उपस्थितांना पंचप्रण शपथ देण्यात आली तसेच मनपा शालेय विद्यार्थ्यांतर्फे देशभक्तीपर नृत्य सादर करण्यात आले. कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, जिल्हा सह आयुक्त अजितकुमार डोके,बल्लारपुर नगर परिषद मुख्याधिकारी विशाल वाघ,सर्व नगर परिषद / नगर पंचायत यांचे मुख्याधिकारी,शासकीय तंत्रनिकेतन विद्यालयाचे प्राचार्य,विविध महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच मनपा अधिकारी कर्मचारी उपस्थीत होते.

**जिल्हाधिकारी विनय गौडा :** 'माझी माती माझा देश' हा उपक्रम प्रत्येक नागरिकाच्या मनात देशभक्तीची भावना वृद्धींगत करणारा तसेच आपल्या कर्तव्यांची जाणीव करून देणारा आहे. स्वातंत्र्य मिळण्याआधी व मिळाल्यानंतरही ज्यांनी देशासाठी बलिदान दिले त्यांच्या प्रयत्नांना नमन करणे व त्याची जाणीव ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. आपला देश अधिक उन्नत होईल यादृष्टीने सर्वांनी कार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

**आयुक्त विपीन पालीवाल :** माननीय पंतप्रधान यांच्या संकल्पनेतुन तयार झालेल्या या उपक्रमाच्या दुस-या टप्प्यामध्ये मनपा क्षेत्रात अमृत कलश यात्रेद्वारे घराघरांतून करण्यात आलेले माती संकलन व यासाठी नागरिकांनी दिलेला उत्स्फुर्त प्रतिसादाबद्दल शहरवासीयांचे आभार. यातुन चंद्रपूरवासियांचे मातृभूमीविषयीचे प्रेम व राष्ट्रीय एकात्मता यांचे दर्शन घडले, मनपाद्वारे राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमात आपले सहकार्य लाभेल, अशी आशा आहे.

# बालिका गाडेकर यांना महात्मा फुले समाजरत्न पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्ह्यातील कळंब शहरातील विद्याभवन माध्यमिक विद्यालयातील इंग्रजी विषयाच्या उपक्रमशील, शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनीच्या लाडक्या व आदर्श शिक्षिका श्रीमती बालिका प्रभाकर गाडेकर यांना पोलीस मित्र सोशल असोसिएशनच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय महात्मा ज्योतिबा फुले समाजरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. लातूर येथे झालेल्या कार्यक्रमात विधी अधिकारी ॲड. वर्षा खोडसे-भिसे यांच्या हस्ते गाडेकर यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी माजी नगरसेविका छाया शिंदे, पोलिस असोसिएशनच्या मराठवाडा अध्यक्षा उषा धावारे, सिद्धार्थ कवठेकर, अच्युत माने, डॉ. खाजा शेख, संस्थेचे सचिव सुफी सय्यद यांची उपस्थिती होती. गाडेकर - यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल पुरस्कार संस्थेचे अध्यक्ष अनिल मोहेकर, सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, शाळेचे मुख्याध्यापक विलास पवार, उपमुख्याध्यापिका सरला खोसे पाटील,पर्यवेक्षक दिगंबर खामकर यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले. त्याचं सोबतच कळंब शहरातील एका संघर्षशिल शिक्षिकेला महात्मा ज्योतिबा फुले समाज रत्न पुरस्कार मिळाला त्याबद्दल संपूर्ण जिल्ह्यात त्यांचं कौतुक केले जात आहे.






# कमर्शियल तत्त्वावरील दुकानांचे नियम धाब्यावर? प्रोप्रायटरऐवजी दुकाने भाड्याने

## अधिकाऱ्यांची आर्थिक मिलीभगत

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरातील बसस्थानकातील दुकाने हे बि.ओ.टी. व कमर्शियल भाडे तत्वावर देण्यात आले. पण काही कमर्शियल प्रोप्रायटरकडून ते दुकाने लाखो रुपये किराणा घेऊन अन्य व्यक्तींना भाड्याने देऊन लाखो रुपायची मलई लाटण्याचे काम खुले आम सुरू आहे. या प्रकाराकडे अधिकारी मात्र आर्थिक मुग गिळुन गप्प बसले आहेत. शासनाने ठरवून दिलेल्या नियमांना धाब्यावर बसवून शासनाची फसवणूक करणाऱ्या प्रोप्रायटरवर व त्यांना मदत करणाऱ्या महामंडळाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी जनतेतून केली जात आहे.लोहा बसस्थानकासमोरील पार्किंगसाठी जागा उपलब्ध नसतांना महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून पार्किंगच्या जागेत मोबाईल गॅलरीसाठी कमर्शियल भाडे तत्वावर दुकान देण्यात आले. पण ते दुकान प्रोपायटर ऐवजी दुसऱ्याला भाड्याने देऊन लाखो रुपये किराणा घेऊन चालवण्यास देण्यात आले. या सर्व प्रकाराकडे महामंडळातील वरिष्ठ अधिकारी मात्र आर्थिक चेरीमेरी घेऊन डोळेझाक करत आहेत. प्रोप्रायटर ऐवजी दुसऱ्याला दुकाने देणे हा गुन्हा असतांना देखील अधिकाऱ्यांना आर्थिक चेरीमेरी देऊन दिवसाढवळ्या शासनाची फसवणूक केली जात आहे. तरीपण महामंडळाचे अधिकारी आर्थिक मुग गिळुन गप्प बसले आहेत. अशा दोषी अधिकारी व प्रोप्रायटरवर शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करुन शासनाची होणारी फसवणूक थांबवावी अशी मागणी जनतेतून केली जात आहे.

लोहा बसस्थानकातील कमर्शियल भाडे तत्वावर दुकान देण्यात आलेली आहेत ती दुकाने प्रोप्रायटरची ऐवजी दुसऱ्याला भाड्याने देता येत नाहीत. जर तसे चौकशीत आढळले तर संबंधित प्रोप्रायटरवर कारवाई करण्यात येईल. **नोडल अधिकारी जे.पी.मंटगे**

# नगरपरिषद कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी उरण नगरपरिषदच्या सर्व विभाग प्रमुखांची सानुग्रह अनुदानासंदर्भात बैठक घेतली. त्यावेळी नगरपरिषद कर्मचाऱ्यांनी गेले वर्षभर विविध कामांमध्ये घेतलेल्या उत्स्फूर्त सहभागा बद्दल समाधान व्यक्त करून त्या योगे उरण नगरपरिषदची मान उंचावण्यासाठी केलेले प्रयत्न विचारात घेऊन दिवाळी सणापूर्वी उरण नगरपरिषदच्या कायम कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान म्हणून रक्कम रू. २७५००/ मंजूर केला आहे.

यावेळी बांधकाम विभाग प्रमुख झेड आर माने यांनी संघटनेच्या मागणी प्रमाणे ३० हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्यासंदर्भात मत मांडले.या मागणीला कामगार नेते संतोष पवार यांनी पृष्टी दिली.

यावर आपले मत मांडताना मुख्याधिकारी यांनी कर वसूलीचे काम जर अधिक चांगल्या पद्धतीने झाले तर आपण केलेल्या मागणीनुसार विचारही करण्याचा त्यांनी मानस असले बाबत व्यक्त केला आहे. त्याच वेळी कामगार नेते संतोष पवार यांनी उरण नगर परिषदेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना देखील बोनस दिवाळी पुर्वी मिळाला तर अधिक आनंद होईल अशी मागणी केली.



# जिवती तालुक्यातील विवादित क्षेत्राचा अहवाल सादर करा : हंसराज अहीर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महसुल विभागाच्या चुकीच्या अहवालामुळे मागील अनेक वर्षांपासून अस्तित्वात असलेला चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्याचा वनजमिन संदर्भातील अन्यायकारक प्रलंबित प्रश्न वन व महसूल विभागाने संयुक्त सर्वेक्षण करून वनक्षेत्र घोषित केलेल्या विवादीत क्षेत्रास डीफॉरेस्टेशन करीत वनक्षेत्रातून वगळण्याची प्रक्रीया शीघ्रगतीने करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी व याविषयीचा अहवाल येत्या 25 दिवसात राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाकडे सादर करण्याचे निर्देश आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी वन व महसुल विभागाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांना सुनावणी दरम्यान दिले. जिवती तालुक्यातील शिष्टमंडळाने आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांची भेट घेवून त्यांचेकडे विषयानुशंगाने लेखी स्वरूपात तक्रार दाखल केल्यानंतर राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाद्वारे याप्रश्नी मुंबई येथे सह्याद्री अतिथीगृहात दि. 17 ऑक्टों. 2023 रोजी सुनावणी घेतली. आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष हंसराज अहीर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सुनावणीला आयोगाचे सदस्य भुवन भुषण कमल, सचिव राजीव रंजन, वनविभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, चंद्रपूर जिल्ह्याचे मुख्य वनसंरक्षक जितेंद्र रामगावकर, जिल्ह्याचे अपर जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, माजी आमदार संजय धोटे, माजी आमदार सुदर्शन निमकर, राजुराचे उपविभागीय अधिकारी माने, जिवतीचे तहसीलदार अविनाश शेंबटवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती.



जिवती तहसीलमध्ये 36 ग्रामपंचायती, 1 नगरपंचायत व 83 महसुली गावांबरोबर अन्य छोटी गावे मिळून 130 गावांचा समावेश आहे. तालुक्याची लोकसंख्या 60 हजार असतांना वनक्षेत्राच्या अडचणीमुळे मागील अनेक वर्षांपासून या तालुक्याचा विकास खुंटला आहे. वनविभागाची परवानगी घेतल्याखेरीज विकासाची कोणतीही कामे होत नाहीत. नगरपंचायत क्षेत्रात साधे घरकुल बांधायचे असल्यास परवानगी मिळत नसल्याने प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभापासून ओबीसी व अन्य प्रवर्गातील नागरीकांना वंचित व्हावे लागत असल्याने मंजूर 664 घरकुलांचा प्रश्न अधांतरी लोंबकळत पडला आहे. राज्य व केंद्राच्या महत्वाकांक्षी विकास योजनांपासून हा तालुका व इथले नागरीक वर्षानुवर्षे वंचित असल्याने आयोगाला ही सुनावणी घेणे आवश्यक ठरले त्यामुळे महसुल व वनविभागाच्या वतीने संयुक्त कार्यवाही करून याप्रश्नी तातडीने मार्ग काढण्याच्या सुचना आयोगाचे अध्यक्ष अहीर यांनी वनविभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी यांना सुनावणी दरम्यान केल्या.

ओबीसी व अन्य प्रवर्गातील नागरीकांना 1972 व 1991 मध्ये महसुल खात्याने भोगवटा-2 चे शेतपट्टे दिले होते. त्या पट्टयांचे फेरफार सुध्दा या प्रश्नामुळे होवू शकलेले नाही. वनजमिनीच्या जटील प्रश्नामुळे या तालुक्यातील शहरी व ग्रामिण क्षेत्रात विकास कामासाठी वनविभागाची अडचण असुन अनेक ज्वलंत प्रश्न ज्यात पेयजल, शेतीचे पट्टे, अकृषक जमिनीचे प्रकरणे, उद्योगधंदे, फेरफार, नविन शेतीचे पट्टे, शाळांच्या इमारती बांधणे, दुरूस्ती, विपूल खनीज संपत्ती अस्तित्वात असतांना वापरास प्रतिबंध असल्याने या तालुक्यातील मोठ्या संखेत असलेल्या ओबीसी व अन्य समाज बांधवांची मुस्कटदाबी होत असुन त्यांना विकासापासून वंचित राहावे लागत आहे. याविषयी या सुनावणीमध्ये ऊहापोह करण्यात आला.

या सुनावणीमध्ये जिवती तालुक्यातील शिष्टमंडळ सहभागी झाले होते. यात जिवती पं.स. चे उपसभापती महेश देवकते, केशवराव गिरमाजी, दत्ताजी राठोड, सुरेश केंद्रे, तुकाराम वारलवाड, गोविंद टोकरे, प्रल्हाद मदने, उत्तम कराळे, पुडियाल मोहदाचे उपसरपंच दत्ताजी कांबळे, खडकी रायपूरचे उपसरपंच राजेश राठोड, माधव निवले, संतोष जाधव आदींची उपस्थिती होती.

# हवालदारासह वेतन अधीक्षकाला अटक

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** सदर पोलीस ठाण्यातील एका लाचखोर पोलीस हवालदारासह वेतन व भविष्य निर्वाह निधी कार्यालयाच्या अधीक्षकाला लाच घेतल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली. पहिली कारवाई दुपारी पोलीस ठाण्यातच करण्यात आली. शेख जमील शेख महबूब (५५, रा. प्लॉट न.७०, नेहरू कॉलनी, पेन्शन नगर) असे लाचखोर हवालदाराचे नाव आहे, तर प्रमोद झांगोजी सोनटक्के (५३, रा. फ्लॅट क्र.५०७, पाचवा माळा, लाईफ स्टाईल सोसायटी) असे लाच घेणाऱ्या अधीक्षकाचे नाव आहे. गेल्या काही दिवसांपासून सदर पोलीस ठाण्याच्या हद्दीत हुक्का पार्लर, सेक्स रॅकेट, वरली-मटका, जुगार अड्डे, गोतस्करी, मांस विक्री आणि मध्यरात्रीनंतरही बार-रेस्ट्रॉरेंट सुरू राहत असल्यामुळे ठाणे चर्चेत होते. पोलीस हवालदार शेख जमील याने ५६ वर्षे वयाच्या तक्रारदाराविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल केला होता. त्या गुन्ह्यातून निर्दोष सुटका होईल अशी व्यवस्था करण्यासाठी शेख जमील याने ५ हजार लाचेची मागणी केली. मात्र, तक्रारदाराने एसीबी कार्यालयात तक्रार केली. एसीबीने बुधवारी दुपारी सदर पोलीस ठाण्यात सापळा रचला. सापळ्यात हवालदार शेख जमील हा ३ हजार रुपयांची लाच स्वीकारताना अलगद अडकला. त्याच्या साथीला 'कलेक्टर' वादग्रस्त कर्मचारीही होता. त्याचीही एसीबीने तासभर चौकशी केली. एका शाळेतील सेवानिवृत मुख्याध्यापकाची अर्जित रजेचे रोखिकरणाची एकूण १३ लाख ३० हजार रुपयांची रक्कम शासनाकडे बाकी होती. ती रक्कम काढण्यासाठी मुख्याध्यापकांनी सर्व कागदपत्रे तयार केली. ती कागदपत्रे वेतन व भविष्य निर्वाह निधी (माध्यमिक) कार्यालय, प्रशासकीय इमारत क्र.२, सातवा माळा येथे जमा केली. त्यांची रक्कम काढून देण्यासाठी कार्यालयाचे अधीक्षक प्रमोद झांगोजी सोनटक्के यांनी ५० हजार रुपयांची लाच मागितली. तडजोडीअंती ४० हजारांची लाच स्वीकारण्याची तयारी दर्शविली. बुधवारी दुपारी सोनटक्के यांनी लाच घेताच त्यांना एसीबीने अटक केली.

# मागासवर्गीयांसाठी असलेली मार्गदर्शिका विद्यार्थ्यांसाठी अमूल्य ठेवा : कुलगुरु डॉ. बोकारे

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** गोंडवाना विद्यापीठाने मागासवर्गीयांसाठी असलेली मार्गदर्शिका प्रकाशित केली. विद्यार्थ्यांना शासकीय योजना विषयी कुठलीही शैक्षणिक समस्या असेल तर त्याच उत्तर ही मार्गदर्शिका आहे. या मार्गदर्शिकेत विद्यापीठाच्या समितीचे मोठे योगदान आहे. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण यांनी या मार्गदर्शिके साठी पुढाकार घेतला. यासाठी मी त्यांचे अभिनंदन करतो. मागासवर्गीयांसाठी असलेली ही मार्गदर्शिका विद्यार्थ्यांसाठी अमूल्य ठेवा आहे असा विश्वास कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे यांनी व्यक्त केला. चंद्रपूर येथील दीक्षाभूमीवर धम्मचक्र अनुप्रवर्तन सोहळ्यात काल गोंडवाना विद्यापीठाची मागासवर्गीयांसाठी उपयोगी असलेली मार्गदर्शिका लोकार्पित तसेच वितरित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली.



त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून सामाजिक न्याय व सक्षमीकरण विभागाचे केंद्रीय मंत्री रामदास आठवले, तर मुख्य अतिथी म्हणून राज्याचे वने व सांस्कृतिकमंत्री सुधीर मुनगंटीवार , आमदार सुभाष धोटे, आमदार प्रतिभा धानोरकर , आमदार सुधाकर अडबाले. गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे तसेच कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान डॉ. अनिल चिताडे आदी उपस्थित होते. या मार्गदर्शिकेत मागासवर्गीयांसाठीच्या सर्व शासकीय योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण केंद्र, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विविध शिष्यवृत्ती व फेलोशिप, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी सुवर्णपदके पारितोषिक, महाराष्ट्र ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेची उद्दिष्टे व कार्ये,गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यृत्ती मंजूर करण्याबाबत, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, सर्व शासकीय मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी असलेल्या आरक्षणात सुधारणा करण्याबाबत, अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पालकांच्या उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याबाबत इत्यंभूत माहिती आहे.

चंद्रपूर येथील दीक्षाभूमीवर नुकत्याच झालेल्या धम्मचक्र अनुप्रवर्तन सोहळ्यात गोंडवाना विद्यापीठाची मागासवर्गीयांसाठी उपयोगी असलेली मार्गदर्शिका उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लोकार्पित करण्यात आली .तसेच विद्यापीठाच्या स्टॉलवर कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे आणि कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते नागरिकांना मार्गदर्शिका वितरित करण्यात आली.यावेळी विद्यार्थ्यांचा प्रचंड उत्साह होता. ही मार्गदर्शिका घेण्यासाठी नागरिकांनी गोंडवाना विद्यापीठाच्या स्टॉल वर गर्दी केली होती.

# उरण तालुक्यामध्ये बौद्ध वर्षावास कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** तालुक्यामध्ये बौद्ध वर्षावास कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बुद्ध वंदना त्रिशरण पंचशील घेऊन पुढील कार्यक्रम प्रारंभ करण्यात आला. यावेळी दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी व उरण तालुक्यातील बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून शांततेत कार्यक्रम पार पडले . यावेळी बौद्ध बांधवांसाठी प्रवचन देण्यात आले असून अन्नदान करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन भारतीय बौद्ध महासभेचे उरण तालुका अध्यक्ष संजय गायकवाड यांनी केले. यावेळी सभा अध्यक्ष व भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा अध्यक्ष एम. डी. कांबळे, महिला अध्यक्ष सुरेखा पवार, गायकवाड गुरुजी आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच कार्यक्रम स्थळी उरण तालुक्यातील बदामवाडी सिद्धार्थ नगर, मांगिरा संघर्ष नगर, बौद्धवाडा, एन.जी.एल. गेट, नाईक नगर, चारफाटा, सावित्रीबाई फुले, बौद्धवाडा तसेच उरण तालुक्यातील विविध क्षेत्रातून बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे औचित्य साधून संजय गायकवाड यांनी ठिकठिकाणी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने बौद्ध असल्याचा प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. तसेच सर्व धार्मिक कार्यक्रम व लग्न, आदी कार्यक्रमासाठी होणाऱ्या अडीअडचणी म्हणजेच कागदोपत्री दप्तर, व बौद्धाचारी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने देणार असल्याचे सांगितले. त्यामुळे बौद्ध बांधवानी आंनद व्यक्त केले आहे.





# बनावट दारू तयार करणारा जेरबंद!

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची छापेमारी

आधुनिक केसरी न्यूज



**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य मुंबई, सुनिल चव्हाण, संचालक राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य मुंबई, प्रदिप पवार, विभागीय उपायुक्त राज्य उत्पादन शुल्क छत्रपती संभाजीनगर, संतोष झगडे, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क छत्रपती संभाजीनगर, शरद फटांगडे, ए. आर. कोटलवार उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शना खाली दिनांक १४ रोजी गुप्त बातमीच्या अनुषंगाने गट नं. ०८. प्लॉट नं. ११५, नागद, ता. कन्नड येथे छापा मारला असता त्या ठिकाणी योगेश हरी चौधरी, रा. आझाद चौक पारोळा, जि. जळगाव ह.मु. गट नं. ०८, प्लॉट नं. ११५, नागद, ता. कन्नड हा ता. पारोळा, इसम प्रथमदर्शनी बनावट रॉयल स्टंग व्हिस्की १८० मि.ली. क्षमतेच्या एकूण ३० सिलबंद दारू बाटल्या, प्रथमदर्शनी बनावट ऑफीसर चॉईस ब्ल्यू व्हिस्की १८० मि.ली. क्षमतेच्या एकूण २० सिलबंद बाटल्या, भारतीय बनावटीची विदेशी मद्य तयार करण्याकरिता लागणारे ३५ लि. क्षमतेची पांढऱ्या रंगाच्या एक प्लास्टीक कॅनमध्ये अंदाजे १५ लिटर स्पिरीट (इ.एन.ए.) द्रव्य, ३५ लि. क्षमतेची पिवळया रंगाच्या एक प्लास्टीक कॅनमध्ये अंदाजे २० लिटर तयार मद्यार्क (ब्लैण्ड) द्रव्य, दारु बाटल्यावर बुच सिलबंद करण्यासाठी लागणारे यंत्र, रॉयल स्टंग व्हिस्की १८० मि.ली. क्षमतेच्या एकूण ६० रिकाम्या दारु बाटल्या ऑफीसर चॉईस ब्ल्यू व्हिस्की १८० मि.ली. क्षमतेच्या एकूण ५० रिकाम्या दारु बाटल्या, हिरो कंपनीची पांढऱ्या रंगांची प्लेझर दुचाकी वाहन क्रमांक -१९- ९९८०, जिओ कंपनीचा मोबाईल ऑफीसर चॉईस ब्ल्यू व्हिस्कीचे १० जिवंत बुचे इत्यादी द्रव्ये व इतर साहित्य वापरून त्यापासून बनावटरित्या विदेशी मा तयार करुन सदरील मद्य रॉयल स्टैग व्हिस्की १८० मि.ली. क्षमतेच्या व ऑफीसर चॉईस ब्ल्यू व्हिस्की १८० मि.ली. क्षमतेच्या रिकाम्या काचेच्या बाटल्यात भरुन सदर बाटल्या त्याकडे असलेल्या जिवंत बुचाने बंद करून बनावट दारूसाठा तयार करून विक्रीच्या उद्देशाने साठवून,बाळगून असताना मिळून आला आहे. सदर कारवाईत रु. १,२४,०७० /- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी योगेश हरी चौधरी याचे विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (अ) (ब) (क) (ड) (ई) (फ), ८०, ८१, ८३, ९०, १०३ व भारतीय दंड संहिता कलम ३२८ अन्वये दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क क-१ विभाग कार्यालयात गुन्हा नोंद करण्यात आला. सदरची कारवाई राज्य उत्पादन शुल्क के विभागाचे निरीक्षक एन. एस. डहाके, दुय्यम निरीक्षक एस.डी. घुले, एस. एस. पाटील, तसेच महीला दुय्यम निरीक्षक श्रीमती पी. आर. हुबांड श्रीमती ए. बी. म्हस्के, सहाय्यक दुय्यम निरीक्षक आर.एम. भारती, आर. के. आंभोरे, जवान सर्वश्री. एम. एच. बहुरे, बी.सी. किरवले, एस. एस. खरात, ए. पी नवगीरे, यांनी केली. सदरील गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक एस.डी. घुले हे करीत आहेत.



# सोयाबीनचे दर निम्म्यावर; सोंगणीचे मात्र दुपटीवर!

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील परिसरात सप्टेंबर महिन्यात पावसाने उसंत घेत पुन्हा सततचा पाऊस पडल्याने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची दाणादाण उडाली. यामुळे मजूरही दुपटीने वाढविले. नऊ हजारांवर गेलेले सोयाबीनचे दर ४ हजारांवर आणले. यात शेतकरी चांगलाच भरडला जात आहे.मात्र मंजूर लोकांची मात्र चांगलीच चांदी होत आहे.सोयाबीनच्या पिकांची सोंगणी सोयगाव तालुक्यात सर्वत्र एकाच वेळेस येत असल्याने मजुरांची चांगलीच कमतरता भासते. यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. मागील वर्षी सोयाबीन पिकाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडे पाठ फिरविली होती. पूर्णतः पीकच हातचे गेले होते. याची उणीव भरून काढण्यासाठी या वर्षी नव्या सावळदबारा परिसरात जोमाने शेतकऱ्यांनी सोयाबीनची पेरणी केली आणि पिकेही बहरली. पण, ऐन आक्टोंबर महिन्यात सोंगणीच्या तोंडावर निसर्गाच्या लहरीपणाचा फटका शेतकऱ्यांना बसला असून त्यांची चांगलीच फजिती झाली.सप्टेंबर महिन्यात पावसाने उसंत घेत पुन्हा सततचा पाऊस पडल्याने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची दाणादाण उडाली. आक्टोबर महिन्यात सोयाबीन सोंगणीला आली यामुळे मजूरही दुपटीने वाढविले. नऊ हजारांवर गेलेले सोयाबीनचे दर ४ हजारांवर आणले. यात शेतकरी चांगलाच भरडला गेला. सोयाबीनच्या पिकांची सोंगणी जिल्ह्यात सर्वत्र एकाच वेळेस येत असल्याने मजुरांची चांगलीच कमतरता भासते. ऐन वेळेवर मजूर मिळणे कठीण जाते. यासाठी शेतकरी बाहेर गावावरुन मजूर आणतात, म्हणून सोयाबीनची सोंगणी करून घेतात या वर्षी जिल्ह्यात सोयाबीनच्या उत्पादनाची उतारी सरासरी पाच पोते होत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. तसेच डिझेलची दरवाढ झाल्याने सोयाबीनची मळणीही महागली.

# जळगाव येथे उपोषणकर्त्यांची प्रकृती ढासळली

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** जिल्हयात दि.10 ऑक्टोबरपासून अन्नत्याग आमरण उपोषणाला बसलेले आदिवासी कोळी समाजाचे ज्येष्ठ समाजसेवक आदरणीय संजय भाऊ कांडेलकर आणि पद्माकर भाऊ कोळी यांची आज प्रकृती ढासाळल्याने मुळे त्यांना दवाखान्यामध्ये उपचारासाठी बळजबरीने नेण्याचे प्रयत्न केले. पण भाऊंनी स्पष्ट नकार दिला आणि म्हणाले की, जोपर्यंत आमच्या संपूर्ण मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत मी उपोषण स्थळीच राहील आपल्या आदिवासीं कोळी समाजाच्या न्याय हक्कासाठी आमचे प्राण गेले तरी चालेल आम्हाला आमच्या प्राणा पेक्षा न्याय अधिक महत्त्वाचा आहे, जगेल तर समाजासाठी मरेल तर समाजासाठीच. गेल्या 10 ऑक्टोबर 2023 पासून आपल्या जीवाची परवा न करता एक समाज हितासाठी आपल्या समाजाचे सहा मावळे आमरण अन्नत्याग उपोषणाला बसले आहेत. आदिवासी कोळी समाजाचे माजी मंत्री डॉ.दशरथजी भांडे साहेब यांनी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची भेट घेऊन आदिवासी कोळी जमातीला जातीचे दाखले का मिळत नाही, असा प्रश्न केला. तसेच प्रांताधिकारी यांना जातीचे दाखले व प्रकरण घेण्याचे आदेश द्यावेत असे सांगितले. आमच्या कडे सर्व पुरावे आहेत हेही त्यांच्या लक्षात आणून दिले. जळगाव जिल्हयात दि.10 ऑक्टोबरपासून आदिवासी कोळी जमातीचे अन्नत्याग आमरण उपोषणाचा आज 6 वा दिवस असून असून भुसावळ, मुक्ताईनगर, बोदवड येथील आदिवासी कोळी जमातीच्या असंख्य लोकांनी उपोषण स्थळी भेट दिली. आदिवासीं कोळी समाजाला न्याय मिळालाच पाहिजे, अशा घोषणा सुद्धा देण्यात आल्या आहेत.



# जागतिक रेस्टॉरंट्स निवड समितीमध्ये विष्णू मनोहर यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** १६ ऑक्टोबर २०२३ रोजी खऱ्या अर्थाने जागतिक अन्न दिवस साजरा झाला. आयसीसीआरचे अध्यक्ष विनय सहस्त्रबुद्धे यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने भारताबाहेर असलेल्या भारतीय उपहारगृहांना 'अन्नपूर्णा' प्रमाणपत्र देऊन सन्मानित करणे, ज्यामूळे भारताबाहेर असलेल्या भारतीय व परदेशी लोकांना भारतीय अन्नाचा स्वाद चांगल्याप्रकारे मिळू शकेल. एक-दीड वर्षांपूर्वी या संकल्पनेची घोषणा झाल्यानंतर १०० च्या वर रेस्टॉरंट्स नी याला प्रतिसाद दिला. यातील निवड झालेल्या रेस्टॉरंट्सला "अन्नपूर्णा" प्रमाणपत्र दिले जाणार आहे. विनय सहस्त्रबुद्धे यांनी दिल्ली येथील एक पत्रकार परिषदेत एक यादी जाहीर केली. स्पर्धेच्या अटीनुसार कमीत कमी ५ वर्ष जुने स्टॉरंट असले पाहिजे. त्यामध्ये मुख्यत्वे करुन भारतीय पदार्थांचा समावेष असावा व त्याचा आस्वाद भारतीयांबरोबरच इतर परदेशी लोकांनी सुद्धा घेतलेला असावा. याच्या निवड प्रक्रियेमध्ये डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, श्री. कुमार तुहीन, श्री. राजीव कुमार, श्री. अभय कुमार, शेफ मनजीत गील, प्रो. पुष्पेश पंत, सतवीर सिंह, विष्णू मनोहर, अरुण पार्थसारथी यांचा समावेश करण्यात आलेला आहे. आपल्या महाराष्ट्रीयांसाठी ही गोष्ट अभिमानाची आहे की विष्णू मनोहर यांची निवड करण्यात आलेले आहे.

जागतिक रेस्टॉरंट्स निवड समितीच्या माध्यमातून "अन्नपूर्णा " प्रमाणपत्र देवून निवड करण्यासाठी जी जागतिक पातळीवर वरील समिती नेमण्यात आलेली आहे त्यामध्ये सात देशांचे मान्यवर आहेत. बालाजी देसाई (श्रीलंका), इंडियन स्ट्रीट फुड ॲन्ड कंपनी (स्वीडन) अंबेर इंडियन रेस्टॉरंट (अमेरिका) नान ॲन्ड करीस ॲंन इथेनिक इंडियन रेस्टॉरंट (कोस्टारीका) मुमताज महल रेस्टॉरंट (ओमान) नमस्ते इंडियन रेस्टॉरंट (मंगोलिया) विष्णू मनोहर (भारत ) अरुण पार्थसारथी (अमेरिका) जागतिक रेस्टॉरंट्स निवड समितीच्या कमिटीच्या आपल्या विष्णू मनोहर यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे हे बाकी खरं.

# राधा पिल्लाईचा सर्वोत्कृष्ट नृत्यांगणा म्हणून गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** एन -३ सिडकोच्या स्वाभिमानी



क्रीडा मंडळाच्या वतीने राधा पिल्लाई हिचा काल झालेल्या स्पर्धेची सर्वोत्कृष्ट नृत्यांगना म्हणून संघटनेचे अध्यक्ष माजी उपमहापौर प्रमोद राठोड यांच्या हस्ते पुष्पगुच्छ स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

कु.राधा पिल्लाई हिचा सर्वोत्कृष्ट पेहराव तसेच उत्कृष्ट नृत्यांगना व सर्वोत्कृष्ट सादरीकरण अशा तिन्ही प्रकारात तिचा गुणगौरव करण्यात आला. राधा पिल्लाई हिने अनेक छंद जोपासले आहेत. राधा ही उत्कृष्ट रंगाच्या आणि फुलांच्या रांगोळ्या सजवत असतें.तिला उत्कृष्ट रेसिपीज देखील येतात. विविध स्पर्धांमधूनही तिचा नेहमीच सहभाग असतो. एक चांगली नृत्यांगना म्हणून तिची ओळख आहे. अशा अनेक कला गुण छंदानी संपन्न असलेल्या की, राधा पिल्लाई हिचा काल गौरव करण्यात आला त्यासाठी तिच्या मित्र मैत्रिणी नातेवाईकांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जातं आहे.

# वर्ल्ड थाई बॉक्सिंगस्पर्धेत वेदा, रोहित यांना सुवर्ण पदक

आधुनिक केसरी न्यूज

**पनवेल :** हैद्राबाद येथे झालेल्या वर्ल्ड थाई बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये कु.वेदा राजेश पिंगळा, कु. रोहित थळी यांनी सुवर्ण पदक पटकावले. उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या कु.वेदा राजेश पिंगळा, कु. रोहित थळी यांना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच दोघांचे अभिनंदन केले.भविष्यातील पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

महिला आघाडीच्या उपशहर संघटिका मालती पिंगळा यांची कन्या कु. वेदा राजेश पिंगळा तसेच विभाग संघटिका वैशाली थळी यांचा सुपत्र कु. रोहित थळी या दोघांनी हैद्राबाद येथे झालेल्या वर्ल्ड थाई बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये सुवर्णपदकाने गौरविण्यात आले. त्याबद्दल जनतेच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे. यावेळी शिवसेना तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, महानगर समन्वयक दिपक घरत, नवीन पनवेल शहर प्रमुख यातीन देशमुख, उपशहर प्रमुख ज्ञानेश्वर भंडारी, महिला आघाडीच्या नवीन पनवेल शहर संघटिका सौ. अपूर्वा प्रभू आदी पदाधिकारी उपस्थित होते.



# डॉ. शेख यांना डॉ. एपीजे अब्दुल कलाम अवॉर्ड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दि. १८ ऑक्टोंबर शहरातील सर्वात जुनी आणि प्रसिद्ध



नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेंसरीचे संचालक डॉ. शेख ए. एच. यांना डॉ. एपीजे अब्दुल कलाम पुरस्कार दिल्ली येथे ओआॅसिस वर्ल्ड रेकॉर्ड संस्थे तर्फे प्रदान करण्यात आले. लोकप्रिय माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम मिजाईल मॅन, भारतरत्न यांची ९२ वी जयंती दि. १५ ऑक्टोंबर २०२३ रोजी दिल्ली मध्ये कॉस्टिटयुशन भवन रफी मार्ग न्यू दिल्ली येथे साजरी करण्यात आली. या प्रसंगी देशातील काही निवडक नामांकित व्यक्तींना डॉ. एपीजे अब्दुल कलाम पुरस्कार प्रदान करण्यात आला. या प्रसंगी प्रो. सत्यनारायण (वाईस चांसलर जी. डी. युनिर्व्हसिटी, दिल्ली) प्रो. सि. एस. दुबे (वॉईस चांसलर के. आर. मंगलम युनिर्व्हसिटी) ऑंबेसेडर डॉ. अनिल त्रिगुण्यात, ॲड. नूपुर धमिजा सुप्रिम कोर्ट वकील, एम.एल.ए. ललन कुमार आमदार- पिरपैंतं - बिहार, डॉ. जी. अशोक कुमार सिनिअर आय. एस. ऑफिसर डायरेक्टर जनरल इत्यादी नामांकित व्यक्ती उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी प्रयत्न करणार

## मुनगंटीवार : क्रीडा क्षेत्र विकासाला प्राधान्य; वर्धा येथे सिंथेटिक स्मार्ट ट्रॅक उभारणार

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याची क्षमता वर्धा जिल्ह्यामध्ये आहे. त्यासाठी उत्तम दर्जाच्या सोयीसुविधा खेळाडूंना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या सुविधा निर्माण करण्यासाठी नक्कीच प्रयत्न केले जातील. राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे केवळ तीनच सिंथेटिक स्मार्ट ट्रॅक आहेत. हे तिन्ही ट्रॅक चंद्रपूर जिल्ह्यात आहेत. आता त्याच धर्तीवर वर्धा जिल्ह्यात ट्रॅक तयार करण्यात येतील, असा विश्वास राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिला.

विकास भवन येथे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने नामवंत खेळाडूंच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला खासदार रामदास तडस, आमदार डॉ.पंकज भोयर, आमदार समीर कुणावार, उपमुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी सुमित वानखडे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सुनील गफाट, माजी खासदार सुरेश वाघमारे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष वैशाली येरावार, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड आदी उपस्थित होते. जिल्ह्यातील प्रत्येक खेळाडूने त्या आवडीच्या क्रीडा प्रकारात नावलौकिक मिळविला पाहिजे. त्यादृष्टीने त्यांना आवश्यक सोयीसुविधा देण्याकरीता शासन त्यांच्या पाठीशी आहे, असेही मुनगंटीवार म्हणाले.

सरकारच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या योजनांबद्दल सांगताना ते म्हणाले, 'तरुणांसाठी रोजगाराच्या योजनांसह शेतकऱ्यांसाठी सुद्धा विविध योजना राबविल्या जात आहेत. माझी कन्या भाग्यश्री, निराधार योजनेच्या अनुदानात वाढ करण्यात आली आहे. गोरगरिबांना घरकुल उपलब्ध व्हावे यासाठी ओबीसी घटकाकरिता घरकुल योजना सुरु करण्यात आली आहे.' भारत पाकिस्तान सिमेवर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्यात येणार असून महाराजांची वाघनखे लंडनवरुन आणण्यात येत असल्याचे मुनगंटीवार म्हणाले. यावेळी खासदार रामदास तडस यांनीही विचार मांडले. ते म्हणाले, 'खेळाडूंना शासकीय नोकरीमध्ये संधी देण्याचे काम राज्य शासन करीत आहे. नोकरीमध्ये संधी दिल्यानंतर या नामवंत खेळाडूंना आशियाई व ऑलिम्पिकसारख्या स्पर्धांमध्ये नशीब आजमावण्यासाठी किमान तीन वर्षे संधी मिळणे आवश्यक आहे. जिल्ह्यात कुस्ती प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या केंद्रामुळे राज्यातील कुस्तीपटूंना मोठा लाभ मिळणार आहे. प्रास्ताविक आमदार डॉ. भोयर यांनी केले. वर्धेतील खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळविणे ही अभिमानाची बाब आहे. तालुकास्तरावर क्रीडा संकुल तयार केल्यामुळे जिल्ह्यात आंतराष्ट्रीय खेळाडू तयार होण्यास मदत होईल, असा विश्वास आमदार भोयर यांनी व्यक्त केला.




**सेवाग्राम शब्दातच सेवा :** महात्मा गांधी यांची पावनभूमी असलेल्या सेवाग्राम या नावातच 'सेवा' शब्द आहे. त्यामुळे येथील नागरिकांसाठी सेवा भावना जोपासत येथील जनता हीच आपला परिवार आहे, हे मानून त्यांच्या कल्याणासाठी येत्या काळात कामे केली जातील, ' अशी ग्वाही पालकमंत्री मुनगंटीवार यांनी दिली

**प्रतिभावंतांचा गौरव :** यावेळी मुनगंटीवार यांच्या हस्ते आशियाई क्रीडा स्पर्धेत 20 वर्षाखालील क्रिकेटमध्ये भारतीय संघाचे तसेच आयपीएलमध्ये हैदराबाद संघाचे प्रतिनिधीत्व करणारा क्रिकेटपटू सौरभ दुबे, स्वीडन येथे झालेल्या हॅन्डबॉल खेळामध्ये भारतीय संघाचे नेतृत्व करणारा अनुज मोहन ठाकरे, वेदांत दिगांबर घोडमारे, रायफल शुटींगमध्ये राष्ट्रीय स्तरावर सुवर्ण पदक प्राप्त करणारा प्रथमेश विजय मेढेवार, क्रीडा क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करणाऱ्या महिला पोलिस सुनयना डोंगरे व इटली, रशिया, नेपाळ येथे जलतरण स्पर्धेत प्राविण्य प्राप्त करुन देशाचे नाव उज्ज्वल करणारे आंतरराष्ट्रीय वयोवृध्द खेळाडू गिरीष उपाध्याय यांचा सत्कार करण्यात आला.

# प्राथमिक दूध संकलन केंद्राचा तपासणी अहवाल सादर करावा : मंत्री छगन भुजबळ

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** दूध उत्पादक शेतकऱ्यांची प्राथमिक दूध संकलन केंद्रावर फसवणूक होऊ नये यासाठी जिल्हा सहकारी दूध संस्था, वैधमापन शास्त्र अधिकारी आणि शेतकऱ्यांचे प्रतिनिधी यांनी प्रत्यक्षात वजन मापासंदर्भात पाहणी करून महिनाभरात अहवाल सादर करण्याचे निर्देश अन्न, नागरी व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिले. यावेळी वैद्यकिय शिक्षण मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालक मंत्री हसन मुश्रीफ यांनी शेतकऱ्यांच्या अन्याय होऊ नये या दृष्टीने अधिकाऱ्यांनी कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. मंत्री भुजबळ म्हणाले की, फॅट व एस.एन.एफ. तपासणीच्या मशीनवर तफावत आढळत असल्याने प्राथमिक स्तरावर दूध संकलन केंद्रामध्ये इलेक्ट्रॉनिक वजन काटे व अन्य साधने वपरून शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. संघाच्या इलेक्ट्रॉनिक वजन काटे व अन्य साधनांमध्ये फेरबदल करता येते का याबाबत तपासणी करण्यात यावी. वजन मापे मशीनवर नोंदवलेला कन्वर्जन फॅक्टर हा बरोबर आहे किंवा नाही याबाबत सखोल तपासणी करावी. तसेच प्राथमिक दूध संस्थांमधील इलेक्ट्रॉनिक वजन काट्यांवर दुधाचे घनफळ व वजन दोन्ही मोजमाप होऊन त्यांची नोंद शेतकऱ्याला दिल्या जाणाऱ्या पावतीवर होण्यासंदर्भाही तपासणी करून महिनाभरात अहवाल सादर करण्याचे निर्देश मंत्री श्री भुजबळ यांनी अधिकाऱ्यांना दिले. यावेळी सचिव सुमंत भांगे, वैध मापन शास्त्रचे सह नियंत्रक विलास पवार, कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संस्था कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष केरबा पाटील, संभाजी ब्रिगेडचे राज्य सह संघटक रूपेश पाटील यांच्यासह प्रतिनिधी उपस्थित होते.





# चारठाणाच्या विकास कामाला निधी कमी पडू देणार नाही : क्रांतीताई संजय जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी संस्थान चे अध्यक्ष ह.भ.प. विष्णुदास नामदेव महाराज ढवळे यांनी येथील वारकरी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून वारकरी संप्रदायातील नामांकित कीर्तनकार, भागवताचार्य, रामायणाचार्य, गायनाचार्य, मृदुंगाचार्य यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांना घडविले आहे. आजपण या ठिकाणी शकडो विद्यार्थ्याला घडवित आहेत यांना या विद्यार्थ्यांसाठी वारकरी शिक्षण संस्थेला परभणी शिवसेना खासदार संजय जाधव यांच्या स्थानिक विकास निधीतून १०लाख रुपयांचा निधी कामाचे उद्घाटन आज दि.१९गुरुवार रोजी सकाळी१०वा. परभणी शिवसेना नेत्या क्रांतीताई संजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थान अध्यक्ष ह.भ.प.नामदेव महाराज ढवळे, भगवानराव राऊत, नानासाहेब राऊत, प्रेक्षा भांबळे, मा.जि.प. सदस्य मीनाताई राऊत, रमेश महाराज तुरे, ह.भ.प. कृष्णा महाराज रासवे चिखलठाणकर, जिंतूर नगरसेविका आशाताई ऊबाळे, बापुराव महाराज जाधव, रामेश्वर बहिरट देवगाव फाटा, उपजिल्हाप्रमुख बंडूजी लांडगे, शिवसेना तालुका प्रमुख जिंतूर रामजी शर्मा, संजय साडेगाकर वालुर, शेषेराव वाघमोडे, शहर प्रमुख अरविंद कटारे, संगिता देशमुख, संरपच वैजनाथ कदम, संदीप अंभोरे, डॉ. अरुण चौधरी, ऊध्दव काजळे,

उपसंरच वाजेद कुरेशी, पत्रकार संघ अध्यक्ष प्रभाकर कुर्हे, बबन कंठाळकर, गजानन मुळे, रामप्रसाद बादाड, शाहीर भारत मुंजे, तैहसिन देशमुख, विठ्ठल चव्हाण, चिंतामण दौंड, शिवशंकर तमशटे, बद्रोद्दीन काझी, सलाम इनामदार, सर्जेराव देशमुख, बाबासाहेब मुधवर, दिनकरराव देशपांडे, दिनकरराव देशमुख, पंजाबराव महाराज काळे,पांडुरंग काळे, सुधाकर क्षिरसागर, मन्मथ खके, राम चव्हाण, विष्णू वानखरे, ओमप्रकाश लोखंडे, जगदीश देशमुख, बबनराव संवडतकर अरूण चव्हाण, सचिन घाटुळ, यांच्यासह पत्रकार किसनप्रसाद खाडे,स.मुस्ताक अहमद, ईसाक काझी ,एकनाथ आवचार, यादव मस्के, तसेच येथील गावातील व परिसरातील मान्यवर उपस्थित होते.

# दीक्षा जाधव गोळाफेक स्पर्धेत प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सातारा यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या १४ वर्षे वयोगटातील गोळाफेक या क्रीडाप्रकारात न्यू इंग्लिश स्कूल, पळशी ता.खंडाळा येथील विदयार्थीनी दिक्षा संभाजी जाधव हिने जिल्हास्तरीय गोळाफेक स्पर्धेतून सातारा जिल्हयात प्रथम क्रमांक मिळवला.या यशाबद्दल तिचे अभिनंदन केले जात आहे.खंडाळा तालुक्यातून दिक्षा हिची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकाने निवड झाली होती.

तिने जिल्हास्तरीय स्पर्धेत अव्वल कामगिरी करून दाखवली. सांगली येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी दिक्षाची निवड झाल्याने विदयालयाच्या व पळशी गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. अत्यंत बेताची कौटुंबीक पार्श्वभूमी असणाऱ्या दिक्षाच्या या उत्तुंग कामगिरीचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. दीक्षा हिची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाल्याने सातारा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष नितिनकुमार लक्ष्मणराव भरगुडे पाटील, पळशी गावच्या सरपंच हेमाताई गायकवाड, उपसरपंच गजानन भरगुडे, ग्रा.पं.सदस्य सुजित दगडे, प्राथमिक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संतोष मालुसरे, शौकत शेख, अशितोष भरगुडे-पाटील,सोमनाथ भरगुडे तसेच स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती व शाळा व्यवस्थापन व विकास समिती पळशी, मुख्याध्यापक व सर्व सेवावृंद न्यू इंग्लिश स्कूल पळशी यांनी अभिनंदन केले. तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीईक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# तुरीच्या शेतात गांजाची लागवड

## ५६ लाखांचा गांजा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, देवसिंग वांगऱ्या पावरा गोरक्षनाथ पाड़ा हिसाळे याने ते कसत असलेल्या गोरक्षनाथ पाड़ा शिवारातील शेतामध्ये गांजा सदृश्य अंमली पदार्थाच्या वनस्पतीच्या झाडांची बेकायदेशीररित्या लागवड केलेली आहे अशी खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. सदर ठिकाणी जावून नमुद बातमीची खात्री करून योग्य ती कायदेशीर कारवाई करणे बाबत पो.नि. हेमंत पाटील यांनी पोसई बाळासाहेब सूर्यवंशी यांचेसह पथकास आदेशीत केले होते व कारवाहीत ५६ लाखाचा गांजा जप्त करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक श्री. हेमंत पाटील, स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांचे मार्गदर्शनाप्रमाणे पोसई / बाळासाहेब सुर्यवंशी यांनी त्यांच्या पथकासह मिळालेल्या बातमीप्रमाणे गोरक्षनाथ पाडाचे शेत शिवारातील शेतात देवसिंग वांगऱ्या पावरा हे कसत असलेल्या शेताचा शोध घेवून शेतात जावुन पाहिले असता, सदर शेतात तुर व कापुस हया पिकात मध्यभागी गांजा सदृश्य अंमली पदार्थाची हिरव्या रंगाची ओले, ताजे झाडे अंदाजे ३ ते ६ फुट कमी अधिक उंचीचे एकुण १२४० झाडांची लागवड केल्याचे दिसुन आले. किंमत १ ) ५६,०८,७५० रुपये किं.चा एकुण १६०२ किलो ५०० ग्रॅम वजनाचा गांजा सदृश्य अंमली पदार्थाचे वनस्पतीचे हिरवे ओले ताजे झाड, पाने फुले व फांदया असलेले मुळासह, मुळापासुन ते शेंडया पर्यंत उंची अंदाजे ३ ते ६ फुटापर्यंत कमी जास्त असलेले प्रती किलो ३,५००/- रुपये प्रमाणे एकुण ५६,०८, ७५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आलेला आहे मुद्देमाल जप्त करुन देवसिंग वांगऱ्या पावरा रा. हिसाळे ता. शिरपूर जि. धुळे सध्या रा. गोरक्षनाथ पाडा हिसाळे ता. शिरपूर जि. धुळे यांचे विरुद्ध पोकों/महेंद्र देवराम सपकाळ, नेम. स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन थाळनेर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई संजय बारकुंड, पोलीस अधीक्षक, धुळे, किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांचे मार्गदर्शनाखाली स्था.गु. शा.चे पो. निरी. हेमंत पाटील, पोसई बाळासाहेब सूर्यवंशी स्थागुशा, धुळे, रविंद्र माळी, पंकज खैरमोडे,महेंद्र सपकाळ, हर्षल चौधरी, किशोर पाटील, चालक राजू गिते अशांनी केली आहे.

# फलटण येथे एकवटणार आरक्षणाचे भगवे वादळ

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**फलटण :** मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर तसेच विविध मागण्यांच्या अनुषंगाने "एक मराठा,लाख मराठा" हा नारा देत शांततेच्या मार्गाने निघालेले सकल मराठा समाज बांधवांचे मोर्चे समस्त महाराष्ट्राने पाहिले आहेत. सरकारे येत आहेत, सरकारे जात आहेत.परंतु मराठा आरक्षणाच्या बाबतीत कोणतेही निर्णय घेतले जात नाहीत. सध्या मराठा योद्धा म्हणून मनोज जरांगे-पाटील यांच्या कडे समस्त मराठा समाज बांधव मराठा आरक्षणासाठी लढणारा योध्दा म्हणून पाहत आहेत. मनोज जरांगे-पाटील यांच्या माध्यमातून महाराष्ट्रभर समाज बांधवांमध्ये करण्यात येत असलेला जागृतीचा झंझावात पाहायला मिळत आहे. यातून आरक्षणाचा सूर्य उगवेल अशी आशा मराठा समाज बांधवांना वाटत आहे. अंतरवाली सराटी या छोट्याशा गावातील त्या उपोषण आंदोलनाने व पोलिसांकडून झालेल्या लाठीचार्ज मुळे समस्त महाराष्ट्राचे लक्ष हे अंतरवाली सराटी या गावांतील आंदोलनाकडे गेले. अंतरवाली सराटी येथील ऐतिहासिक सभेनंतर मराठा योद्धा मनोज जरांगे-पाटील पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या दौऱ्यावर निघालेले असून ते फलटणच्या ऐतिहासिक भूमित मराठा बांधवांना संबोधित करण्यासाठी येणार आहेत. आज शुक्रवार दि.२० ऑक्टोबर रोजी सायंकाळच्या दरम्यान फलटण येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जरांगे पाटील यांच्या भव्य सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे.याबाबतची माहिती मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकांनी दिली.छत्रपती शिवाजी महाराज यांची सासूरवाडी आणि छत्रपती संभाजी महाराज यांचे आजोळ म्हणून फलटणच्या भूमीला एक ऐतिहासिक असे महत्व आहेआज त्याच सातारा जिल्ह्यात मनोज जरांगे-पाटील यांचे आगमन होणार आहे. फलटण येथे मनोज जरांगे-पाटील यांची सभा संपन्न होणार असल्याने सकल मराठा बांधव या सभेस उपस्थिती दाखवत मोठ्या संख्येने एकवटणार असल्याचे म्हटले जात आहे.तसेच सभेची जय्यत तयारी करण्यात आली आहे.मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. म्हणून मनोज जरांगे-पाटील राज्यभर दौरे करून लढत आहेत. मराठा समाज बांधव त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात एकवटलेला आहे.मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनातून आपल्याला आरक्षण मिळेल असा विश्वास समस्त मराठा समाजाला वाटू लागला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक ठिकाणी त्यांच्या सभा होऊ लागल्या आहेत.अंतरवाली सराटी येथील जी ऐतिहासिक सभा संपन्न झाली.त्यावेळी फलटण तालुक्यातील मराठा समाज बांधवांनी सुद्धा तेथे हजेरी लावत. जरांगे पाटील यांच्या पाठीशी उभे राहण्याची समर्थनिय भूमिका दाखविली.मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकांनी मनोज जरांगे-पाटील यांच्या शी चर्चा सुद्धा केली. फलटण येथील सभेच्या आयोजना बद्दल मराठा समाज बांधवांकडून बोलण्यात सुद्धा आले होते. मी फलटणला येईन असा विश्वास जरांगे पाटील यांनी व्यक्त केला होता.आज फलटणच्या ऐतिहासिक भूमीत मनोज जरांगे-पाटील यांची सभा पार पडणार असल्याने फलटण तालुकाच नव्हे तर जिल्ह्यातील मराठा समाज बांधव या सभे दरम्यान एकवटणार आहे. फलटणच्या मातीतून नेहमीच मराठा समाज बांधवांनी मराठा आरक्षणा सह विविध मुद्यांवर आधारित आंदोलने फलटण येथे केलेली आहेत. जिल्हा पातळीवरील आंदोलन असो की राज्यस्तरावरील आंदोलन असो, प्रत्येक आंदोलनात फलटण तालुक्यातील मराठा समाज बांधवांनी सहभाग घेतलेला आहे. मनोज जरांगे-पाटील यांच्यामुळे संपुर्ण महाराष्ट्रात आरक्षणाच्या बाबतीत जागृती करण्याचा प्रयत्न होत आहे. तोच प्रयत्न फलटणच्या मातीत होत असून फलटण तालुक्यातील मराठा समाज बांधव मोठया संख्येने या लढ्यशी जोडलेला असून नक्कीच या सभेने मराठा समाज बांधवांमध्ये एक उत्साह निर्माण करून ही सभा मनोज जरांगे-पाटील गाजवतील हा विश्वास मराठा समाज बांधवांना वाटत आहे.

# बाळासाहेब लबडे यांची कादंबरी : स्वरूप आणि चिकित्सा विषयावर पुणे येथे परिसंवाद

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** श्री दिपलक्ष्मी सहकारी पतसंस्था मर्यादित लि यांच्यावतीने कादंबरी परिसंवाद ,"बाळासाहेब लबडे" यांची कादंबरीःस्वरूप आणि चिकित्सा" या विषयावर स्थळ,नवीपेठ,पत्रकार भवन, सभागृह पुणे येथे वेळ सायं ५.३० वा शुक्रवार दिनांकः२७/१०/२०२३रोजी आयोजित करण्यात आला आहे.या कार्यक्रमात निर्मितीप्रक्रिया भाष्य प्रा.डाँ.बाळासाहेबलबडे(कादंबरीकार ,कवी,गीतकार, गझलकार, समीक्षक, संपादक,अभ्यासक)करणार आहेत तर कादंबरी भाष्यात1)"पिपिलिका मुक्तिधाम"(संस्कृती प्रकाशन, पुणे.)यावर वक्ते :प्रा.डाँ नागनाथ बळते (समीक्षक, प्राध्यापक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) म्हणून बोलणार आहेत 2)"शेवटची लाओग्राफिया"(अथर्व पब्लिकेशन, जळगाव.) वक्ते म्हणून श्री लक्ष्मीकांत देशमुख (ज्येष्ठ साहित्यिक,माजी अध्यक्ष अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन)बोलणार आहेत .3)"काळमेकर लाइव्ह" (पद्मगंधा प्रकाशन,पुणे.) वक्ते म्हणून प्रा.डॉ. दिपक बोरगावे (ज्येष्ठ समीक्षक, कवी, अनुवादक)बोलणार आहेत. तर अध्यक्ष या नात्याने अध्यक्षीय मनोगत भारत सासणे (ज्येष्ठ साहित्यिक, माजी अध्यक्ष अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन)यांचे असणार आहे. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून शिरिष चिटणीस(लेखक आणि अध्यक्ष दिपलक्ष्मी सहकारी पतसंस्था मर्यादित लि. सातारा.)असतील तर प्रमुख उपस्थितीत १) दि.बा.पाटील (ज्येष्ठ साहित्यिक सांगली) २)डॉ. श्रीकांत पाटील(कवी, कादंबरीकार, समीक्षक, कोल्हापुर) ३) बबन धुमाळ (गझलकार पुणे)हे असतील आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन : शाहीर शाहीद खेरटकर (प्रसिद्ध ीर,कवी,पत्रकार,संपादक)करतील. प्रा.डाँ बाळासाहेब लबडे हे समीक्षक, कादंबरीकार, कवी, गझलकार, गीतकार ,संशोधक,संपादक,साहित्य चळवळीचे मानकरी ,नामवंत वक्ते,अनेक राज्यस्तरिय व राष्ट्रीय पुरस्काराचे मानकरी,विविध वाहिन्यांवर व महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात कवितामनामनातली, खारवी बोलीच्या कविता, विडंबन कविता, असे कार्यक्रम सादर करणारे ,पसायदान प्रतिष्ठानचे अध्यक्ष , खरे- ढेरे- भोसले महाविद्यालय गुहागर. जि. रत्नागिरी. येथे गेल्या २५ वर्षांपासून मराठी विभागप्रमुख म्हणून सेवेत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ४ विद्यार्थ्यांना पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे. १० विद्यार्थ्यी संशोधन करीत आहेत. त्यांची एकूण १६ पुस्तके प्रकाशित आहेत. मराठी कादंबरीच्या परिवर्तनाच्या टप्प्यावरील "पिपिलिका मुक्तिधाम" "शेवटची लाओग्राफिया" "काळमेकर लाइव्ह सारख्या नवकादंबरींचे लेखन,नामदेव ढसाळ,नारायण सुर्व यांच्या नंतर मुंबईचे दखलपात्र चित्रण करणारा "मुंबई बंबई बाँम्बे" कवितासंग्रह ,चित्रे कोलटकर यांच्यानंतर "महाद्वार" सारखा मराठी कवितेत मैलाचा दगड ठरलेला कविता संग्रह,ब्लाटेंटिया ,एक कैफियत सारखे कवितासंग्रह .मराठी कादंबरीतील पहिल्या रांगेतील ठरलेली अनोखी" शेवटची लाओग्राफिया" ही कादंबरी."१९९० नंतरची थीम कविता" हे संपादन मराठील पहिले प्रायोगिक संपादन,"एक कैफियत" सारखा भन्नाट गझल संग्रह,"वाटर स्टोरिज" या सनस्टोन प्रकाशन अमेरिका ,प्रकाशित पुस्तकातुन त्यांच्या दोन कथा बीजे कँनडा, युरोप, जर्मनीसह जगभरातील ग्रंथालयात पोहचल्या आहेत." शिष्यवृत्ती" "नौटंकी" या आगामी चित्रपटासाठी त्यांची गाणी आहेत. मराठीतील दिग्गज समीक्षक रत्नाकर मतकरी, डाँ नागनाथ कोत्तापल्ले, डाँ रावसाहेब कसबे,डाँ आनंद पाटील ,डाँ लुलेकर,लक्ष्मीकांत देशमुख,ए. के.शेख ,डाँ सांगोलेकर,वगैरेनी त्यांची दखल घेऊन त्यांचे स्थान अधोरेखन केले आहे वगैरे वगैरे..या कार्यक्रमाचा बौद्धीक आनंद घ्यावा असे आवाहन निमंत्रक श्री दिपलक्ष्मी सहकारी पतसंस्था मर्यादित लि. सातारा यांच्या सर्व पदाधिकार्यांनी केले आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा
सुका मेवा
मसाले
क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू
स्टीलच्या वस्तू
ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे
साफ सफाईचे सर्व साहित्य
आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर